बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक २५ | बुधवार, दि.२७ मे ते २ जून २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## ओबीसी जनगणना व आरक्षण प्रश्नांवर बहुजन समाज पक्षाचा एल्गार

### रखरखत्या उन्हात"जनआक्रोश आंदोलन'; सामाजिक न्यायासाठी विविध मागण्यांचा पुन्हा उच्चार




**गोंदिया :-** सामाजिक न्याय, संविधानिक हक्क आणि आरक्षणाच्या प्रश्नांवर पुन्हा एकदा बहुजन समाज पक्षाने आक्रमक भूमिका घेतली असून, ओबीसी जनगणना, अनुसूचित जाती-जमाती आरक्षणातील उपवर्गीकरण, खाजगी क्षेत्रातील आरक्षण आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी गोंदिया येथे व्यापक जनआक्रोश आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. "बहुजन भाई जागे होतील... चोर आणि दरोडेखोर पळून जातील..." अशा घोषणांनी सजलेल्या या आंदोलनानी आंदोलकांनी परिसर दणाणून सोडला.बहुजन समाज पक्षाच्या गोंदिया जिल्हा युनिटच्या वतीने आज २६ मे रोजी तहसील कार्यालय संकुल, गोंदिया एकदिवसीय आंदोलन ४५ अंश सेल्सीअस तापमानात करण्यात आले.रखरखत्या उन्हात ओबीसी बहुजन समाजातील नागरीक आंदोलनात सहभागी झाले होते. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री भगिनी मायावती यांच्या विचारधारेतून प्रेरित या आंदोलनाला "संविधान रक्षण आणि सामाजिक हक्कांची लढाई" असे स्वरूप आंदोलनाला देण्यात आले.यावेळी ओबीसी जनगणना तात्काळ लागू करण्याची प्रमुख मागणी करण्यात आली असून, अन्यथा जनगणनेलाच विरोध करण्याचा इशारा देण्यात आला आहे. अनुसूचित जाती व जमाती आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ थांबवावी, अशी मागणीही ठामपणे करण्यात आली आहे. तसेच खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करणे, पदोन्नतीमधील आरक्षण त्वरित सुरू करणे, शेतकऱ्यांना २४ तास वीजपुरवठा करणे आणि जिल्ह्यात वाढत्या खाण माफियांच्या मनमानीला लगाम घालणे, या मागण्याच्या समावेश होता.

बहुजन चळवळीतील विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी या आंदोलनात सहभागी झाले होते. या आंदोलनात ॲड. सुनील डोंगरे,डॉ. मोहन रायकवार,जिल्हाध्यक्ष व नगरसेवक सुनिल भरणे,मोहसिन खान,नगरसेविका स्नेहा गडपायले,सचिन नांदगाये याशिवाय विधानसभा समित्या, महिला विभाग, शहर समित्या आणि बसपाचे विविध पदाधिकारी,अर्जुनी-मोरगाव, तिरोडा-गोरेगाव, आमगाव-देवरी तसेच गोंदिया विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्त्यांनीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### १२ वर्षांनंतर जिल्ह्याचे तापमान गेले ४६.१ अंशावर

**२०११ मध्ये पारा गेला होता ४७.५ अंशावर**

**वाढत्या तापमानाने अंगाची लाही लाही**

**गोंदिया :-** मागील एक आठड्यापासून दिवसांपासून जिल्ह्यात सूर्याने आग ओकण्यास सुरुवात केली असून, उष्णतेने गेल्या १२ वर्षातील नीचांक मोडला आहे. सन २०१४ मध्ये जिल्ह्याचे तापमान ४५.१ अंश सेल्सिअस नोंदवले गेले होते. त्यानंतर, तब्बल १२ वर्षांनी यंदा तापमानाचा पारा आज सोमवारला नवतपाच्या पहिल्याच दिवशी (दि.२५) थेट ४६.१ अंशावर पोहोचला आहे.तर आज २६ मे रोजी ४५.२ अंशावर तापमन पोचले. या भीषण उन्हाळ्यामुळे संपूर्ण जिल्ह्याचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून, नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नागरिकांना काळजी घेण्याचे तीव्र आवाहन केले आहे.

२४ मे रोजी हवामान खात्याने घेतलेल्या नोंदीनुसार जिल्ह्याचा पारा थेट ४५, तर शनिवारला ४४.९,शुक्रवारला ४४.९ तर गुरुवार(दि.२१ मे)ला ४५.२ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. या भीषण आणि अंगाची लाहीलाही करणाऱ्या उष्णतेमुळे नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.विशेष म्हणजे नऊतपाला २५ मेपासून सुरुवात झाली असून कालावधीत तापमानात अधिक वाढ होत असल्याने यंदाचे तापमान सन २०११ चा ४७.५ अंश सेल्सिअस तापमानाचा रेकार्ड मोडणार का? अशी चिंता आतापासूनच जिल्हावासीयांना सतावू लागली आहे.

## जनगणनेला गावकऱ्यांचा विरोध; ओबीसींचा कॉलम नसल्याने बहिष्कार




**गोंदिया-**जिल्ह्यात शनिवारपासून अधिकृतपणे गृहगणनेला सुरुवात झाली असली, तरी जिल्ह्यातील विविध तालुक्यात या प्रक्रियेला पहिल्याच दिवशी स्थानिक नागरिकांच्या तीव्र रोषाचा सामना करावा लागला आहे. २०२६-२७ च्या या जनगणनेमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी (ओबीसी) स्वतंत्र कॉलम नसल्याने संतप्त झालेल्या अनेक गावातील ग्रामस्थांनी जनगणनेवर थेट बहिष्कार टाकला आहे.

गावात दाखल झालेल्या जनगणना कर्मचाऱ्यांना गावकऱ्यांनी स्पष्ट शब्दांत नकार देत आल्यापावली परत पाठवले. जोपर्यंत जनगणनेच्या अर्जात ओबीसींसाठी स्वतंत्र रकाना समाविष्ट केला जात नाही, तोपर्यंत खापा गावात कोणत्याही प्रकारची जनगणना करू दिली जाणार नाही, अशी ठाम भूमिका गावकऱ्यांनी घेतली आहे.जोपर्यंत जातनिहाय जनगणना होत नाही आणि त्यात ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम दिला जात नाही, तोपर्यंत समाजाच्या खऱ्या स्थितीचे आणि संख्येचे मूल्यांकन होऊ शकत नाही. शासनाने ओबीसी समाजाची ही मागणी सातत्याने दुर्लक्षित केल्यामुळेच आता ग्रामीण भागातून हा संताप जनआंदोलनाच्या रूपाने समोर येत आहे. खापा गावातून सुरू झालेला हा विरोध आता संपूर्ण जिल्ह्यात आणि राज्यात पसरल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा सकल ओबीसी संघटनाच्यावतीने देण्यात आलेला आहे.

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम असावा ही मागणी जोरात सुरू आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये जनगणेवर बहिस्काराचे मोठे फलक लावण्यात आले आहेत. जिल्हा आणि तालुका स्तरावर सरपंच संघटना ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम ची मागणी करत जर स्वतंत्र कॉलम नसेल तर जनगणनेवर बहिष्कार असहयोगाची भूमिका सरपंच संघटनांनी घेतली आहे.सकल ओबीसी महामोर्चा, ओबीसी संघर्ष कृती समिती भंडारा आणि गोंदिया गावागावात जाऊन जनजागरण करीत आहे.नागरिक स्वतः प्रगणकास माहिती देणार नसल्याचे लेखी पत्र देऊन आपला विरोध दर्शवत आहेत.

गोरेगाव येथे २८ मे रोजी ओबीसींचा कॉलम नाही तर जनगणना नाही या विषयाला घेऊन ओबीसी बहुजन महासंघाच्यावतीने मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.तर गावातील नागरीक तहसिलदारांना निवेदन देत आहेत.दुसरीकडे भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेल्या १५ दिवसापासून साखळी आंदोलन सुरु आहे.

## शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ

**मुंबई-** देशात सुरु असेल्या जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

त्यानुसार आता शासनाला ३० जून २०२६ पर्यंत बदली प्रक्रिया राबविता येणार आहे. यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. त्याबाबतच्या मसुद्यासही मंजुरी देण्यात आली.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात करण्यात येतात. मात्र देशात जनगणना २०२७ अंतर्गत पहिला टप्पा सुरु आहे. त्यामध्ये घरयादी तयार करणे व घरगणना हे काम १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत करण्यात येणार आहे.

जनगणनेच्या कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येऊ नये असे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. त्यामुळे या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांना ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ द्यावी लागणार आहे. त्यानुसार बदली संदर्भातील अधिनियमात मुदतवाढीबाबत सुधारणा करावी लागणार आहे. त्यानुसार या मुदतवाढीबाबतचा अध्यादेश राज्यपाल यांच्या मान्यतेने जाहीर करण्यास मान्यता देण्यात आली.

## बिनागुंडाच्या जंगलात सापडला माओवाद्यांचा शस्त्रांचा कारखाना



### घटनास्थळावर मिळाले हे साहित्य

**यावेळी जंगलातील माओवाद्यांच्या ठिय्यावरून एक लेथ मशीन, बिजीएल पाईप्स, १२ बोअर पाईप, इन्व्हर्टर, जनरेटर, बॅटरी, ग्राइंडींग/ड्रिलींग मशीन, जीग सॉ मशीन, प्रेशर पंप, सोलर पॅनल, फुटबॉल पाईप (२० फुट) इ. माओवादी साहित्य हस्तगत करण्यात गडचिरोली पोलीस दलाला यश आले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळावरून सर्व माओवादी साहित्य जवानांच्या मदतीने जागीच नष्ट करण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक एम.रमेश, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी., पोलीस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष अभियान पथक गडचिरोली आणि प्राणहिता, तसेच बीडीडीएस पथकातील जवानांनी यशस्वीरित्या पार पाडली.**

**गडचिरोली :-** विविध प्रसंगी घातपात घडविण्यासाठी उपयोगात येणाऱ्या शस्त्रांस्त्रांची आणि स्फोटकांची निर्मिती करण्यासाठी माओवाद्यांनी बिनागुंडाच्या जंगलात गुप्त कारखाना उभारला होता. गेल्या १६ मे रोजी पोलिसांच्या ‌‌ऑपरेशन अंतिम प्रहारनंतर आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांकडून मिळालेल्या महत्वपूर्ण माहितीच्या आधारे पोलिसांनी सलग दोन दिवस शोधमोहीम राबवून तो कारखाना शोधून काढला. त्या ठिकाणी जमिनीत लपवून ठेवलेले विविध साहित्य तिथेच नष्ट करण्यात आले.

विशेष अभियान पथकाच्या ६ चमू आणि बॉम्ब शोधक-नाशक पथकाच्या २ चमुंनी मिळून हे अभियान राबविले. नक्षल सप्ताह किंवा निवडणुकीसारख्या काळात दहशत निर्माण करण्यासाठी माओवादी हिंसक कारवाया घडवून आणत होते. त्यासाठी बिनागुंडाच्या जंगलातील या कारखान्यातून त्यांना विविध साहित्य आणि शस्त्र पुरविले जात होते.

दि. २१ मे २०२६ रोजी पोलीस अधीक्षक एम.रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली सदर जंगल परिसरात विशेष अभियान पथक गडचिरोली व प्राणहिता यांच्या संयुक्त ६ तुकड्या आणि बॉम्ब शोधक-नाशक (बिडीडीएस) विभागाचे २ पथक शोधअभियानासाठी रवाना केले होते. दिनांक २२ मे रोजी पोलीस मदत केंद्र बिनागुंडाच्या उत्तरेकडील जंगल परिसरात विशेष अभियान पथकांनी घेरा घालुन बिडीडीएसच्या जवानांनी सदर जंगल परिसराची कसून तपासणी केली.

## शहरात अनधिकृत बांधकामावर चालणार बुलडोजर

### ३ जूनपासून नगर परिषदेची मोहीम : कारवाईसाठी निवडलेले रस्ते केले जाहीर




**गोंदिया :-** नगर परिषद प्रशासनाचा नियोजनशून्य कारभार व त्यात राजकारण्यांचा हस्तक्षेप यामुळे शहराला व्यवस्थितपणा लाभला नाही. परिणामी, नियमांची पायमल्ली करून बघावे तेथे अतिक्रमण करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, रस्त्यांवरील अतिक्रमणाची समस्या जास्त गंभीर असून, अगोदरच रस्ते अरुंद असताना अतिक्रमण शहरवासीयांसाठी त्रायदायक ठरत आहे. अशात नगर परिषदेने आता प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी कंबर कसली असून, ३ जूनपासून विशेष राबविली जाणार आहे.या अंतर्गत कारवाईसाठी निवडलेले रस्ते जाहीर केले असून, अतिक्रमणधारकांना अगोदरच जागा सोडण्यासाठी सूचित केले आहे.

गोंदिया शहराच्या विकासाला राजकारण्यांची आडकाठी राहिली यात शंका नसून हेच कारण आहे की 'टाऊन प्लानिंग'ला तिलांजली देत शहरवासीयांनी आपापल्या मर्जीने बांधकाम करून टाकले आहे. यामुळेच गोंदिया शहराच्या विकासाला अडसर निर्माण होत असून, आता आहे त्या स्थितीत कामे करावी लागत आहेत. विशेष म्हणजे, रस्त्यांची समस्या सर्वात गंभीर असून अगोदरच अरुंद असलेल्या रस्त्यांवरही अतिक्रमण करण्यात आल्यामुळे कित्येक रस्त्यांवरून ये-जा करणेही कठीण होत आहे. या रस्त्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी नगर परिषदेने पुढाकार घेतल्यास त्यात राजकारण येत असून, तो विषय जिथल्या तिथेच मुरून जातो. परिणामी, समस्या दिवसेंदिवस अधिकाधिक गंभीर होत आहे. अशात आता शहरातील प्रमुख मार्गावर करण्यात आलेले अतिक्रमण काढण्यासाठी नगर परिषदेने कंबर कसली असून, ३ जूनपासून शहरात अतिक्रमण हटाव मोहिम राबविली जाणार आहे.

### कारवाईसाठी ठरविलेले प्रमुख रस्ते

**जयस्तंभ चौक ते नगर परिषद कार्यालय, गोरेलाल चौक ते नेहरू चौक, जयस्तंभचौक ते एलआयसी चौक, स्टेडियमसमोरील परिसर, अवंतीबाई चौक ते साई मंदिर, नेहरू चौक ते सिव्हिल लाइन, कालेखा कंपनी ते रेल्वे स्टेशन मालधक्का, लोहा लाइन, चना लाइन, पोलिस ठाणेसमोरील प्रीतम चौक**

## ॲट्रॉसिटी कायद्याच्या सखोल माहितीसाठी जिल्हा पोलीस दलाची कार्यशाळा

**गोंदिया :** अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ व सुधारणा अधिनियम २०१५ च्या प्रसिध्दी, जनजागृती, प्रभावी अंमलबजावणी व गुणवत्तापूर्ण तपासकामी सखोल माहितीसाठी जिल्हा पोलीस दलाची कार्यशाळा सोमवारी जिल्हा नियोजन भवन सभागृहात पार पडली. अपर पोलीस महासंचालक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्गदर्शनात नागरी हक्क संरक्षण, नागपूर परिक्षेत्र, नागपूर अंतर्गत कार्यशाळा नागरी हक्क संरक्षण पथक यांच्यावतीने आयोजित करण्यात आली होती.सदर कार्यशाळेला मार्गदर्शन करतांना ॲड. एकता गणविर, पॅनल लॉयर जिल्हा व विधी प्राधिकरण, गोंदिया यांनी ॲट्रॉसिटी कायद्याची विस्तृत माहिती दिली. ॲड. क्रिष्णा पारधी, शासकिय अभियोक्तायांनी महत्वाचे न्यायनिर्णय व कायद्याची माहिती व आरोपीचे दोषसिध्दीचे प्रमाण वाढवण्याबाबत मार्गदर्शन केले.

## आईच्या नावाचं घर: पण आसरा मात्र परक्यांच्या दारी



### १५ दिवसांत घर खाली करण्याचे मुलाला आदेश

**'वृद्ध आई-वडिलांना त्यांच्या स्वतःच्या घरात सन्मानाने आणि भीतीमुक्त वातावरणात राहण्याचा अधिकार आहे,' असे स्पष्ट करत जिल्हाधिकाऱ्यांनी मुलाला १५ दिवसांत घर खाली करण्याचे आदेश दिले. हा निर्णय म्हणजे फक्त कायदेशीर आदेश नाही, तर वृद्ध पालकांच्या सन्मानाचा आवाज ठरला आहे. आयुष्यभर मुलांसाठी झटलेल्या आई-वडिलांना शेवटच्या टप्प्यात घराबाहेर उभं राहावं लागू नये, याची जाणीव समाजाला करून देणारी ही घटना आहे.**

**गोंदिया :-** शहरातील गौतमनगर, बाजपेयी वॉर्ड, येथील आपल्या हक्काच्या घरात आयुष्याची संध्याकाळ शांततेत जाईल, अशी अपेक्षा ७९ वर्षीय कौशल्या मंदारकर आणि ८६ वर्षीय हरिराम मंदारकर यांनी केली होती. कष्टाने उभं केलेलं घर, संसाराची आठवण जपणाऱ्या भिंती आणि मुलांच्या भविष्याकरिता केलेल्या त्यागाची साक्ष देणारा प्रत्येक कोपराः पण वृद्धापकाळात याच घरातून बाहेर पडण्याची वेळ त्यांच्यावर येईल, असा विचारही त्यांनी कधी केला नव्हता.

वयाच्या या टप्प्यावर आई-वडिलांना आधाराची गरज असताना, त्यांचाच मुलगा दिनेश मंदारकर याच्यासोबत मालमत्तेच्या कारणावरून वाद वाढत गेला. वृद्ध दाम्पत्याच्या म्हणण्यानुसार, घरातील भांडणे, शिवीगाळ, धमक्या आणि मानसिक छळ हा रोजचाच भाग बनला होता. 'आपल्या बाजूने उभं राहत नाहीत,' या रागातून मुलाचा संताप थेट आई-वडिलांवरच निघत होता.

१३ मे २०२५ चा दिवस त्या वृद्ध दाम्पत्यासाठी काळजाला चिरणारा ठरला. मालमत्तेच्या वादातून संतापलेल्या मुलाने आई-वडिलांना घराबाहेर काढले. त्यांच्या वस्तूही घराबाहेर फेकल्या. स्वतःच्या नावाचं घर असूनही वृद्ध दाम्पत्याला दुसऱ्यांच्या दारी आसरा घ्यावा लागला.

आयुष्यभर ज्यांच्यासाठी झटले, त्यांच्याच हातून झालेला हा अपमान त्यांना आतून हादरवून गेला.

न्यायासाठी त्यांनी प्रशासनाचा दरवाजा ठोठावला. सुरवातीला त्यांचा अर्ज फेटाळण्यात आला. मात्र, त्यांनी हार मानली नाही. अखेर जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील करण्यात आले. सुनावणीदरम्यान घर हे कौशल्या मंदारकर यांच्या नावावरील स्वअर्जित मालमत्ता असल्याचे स्पष्ट झाले. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय केवळ एका कुटुंबापुरता मर्यादित राहिला नाही, तर समाजासाठीही महत्त्वाचा संदेश देणारा ठरला.

## दिल्ली-हावडा मार्गावरील गाड्याकरीता रेल्वेचा नवीन बायपास मार्ग होणार



### दिल्ली-हावडा प्रवाशांचा वेळ वाचणार

**या नवीन मार्गामुळे देशातील दोन प्रमुख रेल्वे मार्ग म्हणजेच दिल्ली आणि हावडा थेट जोडले जातील. दिल्लीकडून नागपूरच्या दिशेने येणाऱ्या गाड्यांना नागपूर मुख्य स्थानकावर न आणता थेट गोधनी आणि कळमना मार्गे हावडाकडे वळवता येईल. तसेच, हावडाहून गोंदिया आणि कळमना मार्गे येणाऱ्या गाड्या नागपूर स्थानकावर न थांबता थेट गोधनीवरून दिल्लीकडे रवाना होतील. यामुळे इंजिन बदलण्याचा आणि दिशा बदलण्याचा रेल्वेचा वेळ वाचून प्रवाशांचा प्रवास अधिक वेगवान होणार आहे.**

### पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण

**हा मार्ग प्रवासी गाड्या चालवण्यासाठी योग्य बनवण्याच्या दृष्टीने रेल्वे प्रशासनाकडून सध्या ट्रॅकचे सक्षमीकरण केले जात आहे. मेल आणि एक्स्प्रेस गाड्यांचा वेग आणि प्रवाशांची सुरक्षा लक्षात घेऊन येथे अवजड क्षमतेचे आधुनिक स्विचेस बसवणे आणि उच्च दर्जाच्या गिट्टीचा वापर करण्याचे काम सुरु आहे. सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता या मार्गाचे संपूर्ण आधुनिकीकरण केले जात आहे.**

### दोन रेल्वे झोनचा महत्त्वाचा दुवा

**गोधनी हे मध्य रेल्वेचे नागपूर शहराच्या वेशीवर असलेले स्थानक आहे, तर कळमना हे दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वेचे महत्त्वाचे स्थानक आहे. हे दोन्ही वेगवेगळे रेल्वे झोन या कॉर्ड लाईनमुळे थेट जोडले गेल्याने रेल्वेच्या परिचालन व्यवस्थेला मोठी मदत होणार आहे. रेल्वे प्रशासनाने या प्रकल्पाच्या पूर्ततेसाठी ३१ जुलै २०२८ ही अंतिम मुदत निश्चित केली असून, त्यानंतर नागपूरकरांना आणि देशभरातील प्रवाशांना एका नव्या बायपास प्रवासाचा पर्याय उपलब्ध होईल.**

**नागपूर:-** रेल्वे स्थानकावरील गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वेने कळमना ते गोधनी दरम्यान नवा बायपास मार्ग सुरू करण्याचे काम हाती घेतले आहे. यामुळे दिल्ली-हावडा मार्गावरील गाड्या नागपूर स्थानकात न येता थेट धावतील, ज्यामुळे प्रवाशांचा वेळ वाचणार आहे.महाव्यवस्थापकांकडून प्रत्यक्ष पाहणी

मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी नुकताच नागपूर दौरा करून कळमना ते गोधनी या महत्त्वाकांक्षी रेल्वे मार्गाची प्रत्यक्ष पाहणी केली. सद्यस्थितीत या १३.७ किलोमीटरच्या कॉर्ड लाईनचा (बायपास मार्ग) वापर केवळ मालगाड्यांच्या वाहतुकीसाठी केला जातो. मात्र, नागपूर रेल्वे स्थानकावरील गाड्यांची संख्या आणि प्रवाशांची गर्दी नियंत्रित करण्यासाठी हा मार्ग आता प्रवासी गाड्यांसाठी सज्ज केला जात आहे. महाव्यवस्थापकांनी कामाच्या गतीबाबत समाधान व्यक्त करत सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत.

## संपादकीय

### कुलकर्णी-मांढरे-मोटेगावकर-खरात आदी मुसलमान नाहीत बरं!

गेल्या बारा वर्षांपासून देशात कोणताही गुन्हा घडला की त्यातील आरोपी कोणत्या धर्माचे आहेत, कोणत्या जातीचे आहेत हे सर्वांत आधी पाहिलं जातं व त्यानंतर प्रतिक्रिया दिली जाते. जर आरोपी मुसलमान असला तर त्याची मीडिया ट्रायल तर होतेच त्याच्या घरावर बुलडोझर चालवून त्याच्या संपूर्ण कुटुंबाला शिक्षा दिली जाते आणि प्रत्येकवेळी संपूर्ण मुसलमान समाजाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. यातूनच अनेक मुसलमान नागरीकांना विनाकारण आपले जीव गमवावे लागले,अनेकांवर खोट्या केसिस लावून जेलमध्ये सडविण्यात आले. त्यापार्श्वभूमीवर नीट परीक्षेचा पेपर फोडणा-यांत अद्याप तरी मुसलमान नाहीत हे आवर्जुन सांगावंसं वाटतंय ! नाहीतर "नीट जिहादची' कोल्हेकुई या नीच धर्मांध मंडळीने केली असती !!!

खरंतर कोणत्याही गुन्हेगाराकडे केवळ गुन्हेगार म्हणूनच पाहिले पाहिजे. गुन्हेगाराचा धर्म शोधण्याची सामाजिक सवय धोकादायक आहे. २०१४ पासून बिघडविण्यात आलेल्या आपल्या देशात गुन्हेगाराची जात-धर्म शोधण्याचा "मेक इन इंडिया' ट्रेन्ड सुरू झाला आहे. त्यातूनच नीट परीक्षेचा पेपर फोडण्यात सापडलेले कुलकर्णी, मांढरे, मोटेगावकर आदींच्या जातीचा शोध घेतला जाऊ लागला. सोशल मीडियावर त्यांच्या जातीला शिव्या घातल्या गेल्या हेही अत्यंत वाईट आहे. कुलकर्णीने पेपर फोडून शेण खाल्लं म्हणजे तो ज्या जातीचा (कुठल्या माहिती नाही ) आहे त्याची संपूर्ण जातच शेण खाणारी आहे का ? मांढरे बाईचं अख्खं खानदानचं शेणावर जगत आहे का ? आणि ही मंडळी ज्या धर्मातील आहेत त्या धर्मावरही असंच खापर फोडावं का ? नक्कीच हे योग्य होणार नाही. या लोकांनी जे शेण खाल्लं आहे ते त्यांचं वैयक्तिक कर्म आहे, त्यांचा दोष त्यांच्या जातीला किंवा धर्माला देणं योग्य नाही. गुन्हेगारी, लोभ, विकृती, अनैतिकतेला जात-धर्माच्या सीमा नसतात !

आता तो नाशिकचा खरात ! मुळात तो भोंदू नाहीच !! त्याच्याकडे जाणारे-जाणाऱ्या भोंदू आहेत, कारण तेच समाजात उजळ माथ्याने फिरतात आणि लपून असले धंदे करतात !!! बरं, तो मागास जातीचा आहे असं कुणीतरी जाहीर केलं. मग लगेच मागास जातीच्या कुणा कार्यकर्त्याने खरातच्या गावात जाऊन त्याची जात शोधून काढली आणि तो मराठा असल्याचे जाहीर केलं. याला काय अर्थ आहे. "ज्यांच्या अकलेने शेण खाल्लं त्यांना खरातने मुत पाजलं, ज्यांना अंधभक्तीची गुंगी चढली त्यांना त्याने टेबलवर चढवलं' एवढं हे सोपं सूत्र असताना त्याची जात शोधण्याचं काय कारण होतं ? तो केवळ एक गुन्हेगार आहे एवढं का नाही पाहिलं गेलं ?

नरसापूर येथे लैंगिक अत्याचार करून बालिकेची हत्या करणारा आरोपी कांबळे हा ठराविक जातीचा आहे म्हणून काय त्याच्या जातीला दोष द्यायचा ? त्याच्या जातीच्या लोकांनी तर त्याला 'भर चौकात फाशी द्या' असं जाहीर केलं हे विशेष ! अशी मागणी अजून खरात किंवा कुलकर्णी, मोटेगावकर, मांढरे, वाघमारे, खैरनार यांच्या जातीच्या लोकांकडून झाालेली नाही, खरं तर तसं अपेक्षितही नाही.

आज आपण आपल्या देशाला कुठल्या स्थितीत नेऊन ठेवलं आहे हे दाखविण्यासाठी या घटनांचा उल्लेख केला हे सुज्ञ लक्षात घेतीलच. जे सुज्ञ नाहीत त्यांच्याबद्दल काही करता येत नाही, त्यांना झुरळांच्याच ताब्यात द्यावं लागेल असं वाटतंय ! अस्वच्छता वाढली की झुरळं वाढतात. झुरळं आहेत म्हणजे अस्वच्छता आहेच ! जर झुरळांची भीती वाटत असेल तर स्वच्छता ठेवायला हवी. केवळ झुरळं संपवून होणार नाही ! ज्यांना अस्वच्छतेतच आनंद वाटतोय त्यांनी खुशाल झुरळं मारण्याचा प्रयत्न करावा, पण लक्षात ठेवावं कधी न कधी झुरळ त्यांची वाट लावणारच !

नीटच्या परीक्षेचा पेपर फोडून एकाच वेळी २२ लाख मुलांचे खच्चीकरण करण्याचे षडयंत्र हे नक्कीच दहशतवादासारखेच आहे. यातील ४ मुलांनी तर स्वहत्या केली. त्यामुळे यात सहभागी असणाऱ्या शिवराज मोटेगावकर, पी.व्ही.कुलकर्णी, शुभम खैरनार, धनंजय लोखंडे आणि मांढरे- हवालदार- वाघमारे या तीन मनिषा आदी बाराही जणांवरही मनुष्यहत्येचा गुन्हा दाखल व्हायला हवा. एनटीएचा अध्यक्ष जोशी याच्याही पार्श्वभागावर कायद्याची लाथ मारायला हवी. राजस्थानमध्ये पेपरफुटी विरोधात मोठं आंदोलन झालं मात्र मुळ सुत्र ज्या राज्यात आहेत त्या राज्यात कुणी आवाज करायला तयार नाही. याचं कारण काय ? काय आरोपी मुसलमान नाहीत म्हणून ? की ठराविक जातींचे आहेत म्हणून ? यातील एकजरी मुसलमान असता तर नक्कीचं त्याचं घर पाडलं गेलं असतं असं म्हणायला देशातील परिस्थिती मजबूर करत आहे.

मुळात जोपर्यंत आरोप सिद्ध होत नाहीत तोपर्यंत कुणालाही दोषी मानता येत नाही, मात्र हा शहाणपणा या देशात मुसलमान व मागास जातींच्याबाबतीत दाखवला जात नाही हे दुःखद आहे. मुसलमानांच्या देशभक्तीवर आणि मागासांच्या गुणवत्तेवर प्रश्न निर्माण केले की यांचं काम भागतं. आता कुलकर्णी-मांढरे- मोटेगावकर आदी (तथाकथित) गुणवत्ताधारक चोरटे तुप लावून शेण खात होते हे दिसून आलं त्यावर काय म्हणायचं ? देशाच्या सुरक्षिततेची गोपनिय माहिती पाकिस्तानमधील एका बाईच्या नादाला लागून पुरविणारा डॉ. प्रदिप कुरूलकर हाही असाच होता, मग त्याचं खानदान, त्याची जात, त्याचा धर्म आणि त्याचं संघटन देशद्रोही ?

नीट परीक्षेचा पेपर फोडला जाणं हे हा देश कोणत्या गलिच्छ अवस्थेला गेला आहे हेच दाखविणारं आहे. अनेक अंधभक्तांचीही मुलं या परिक्षेला बसली असतील, ते आपल्या मुलांना काय सांगत असतील ? देशात अशी अव्यवस्था निर्माण करण्यात आपलाही वाटा असल्याचे अभिमानाने सांगत असतील काय ? त्यांची पोरं झुरळ पार्टीत सहभागी होऊन शिक्षण मंत्र्याचा राजीनामा मागू लागली तर काय त्यांना हिट करतील ? जे जे पालक अंधभक्त आहेत तेही या देशातील अवस्थेला तेवढेच जबाबदार आहेत. या देशाची वाट लावण्यात त्यांनी मोठी भूमिका बजावली आहे. काय ते आपल्या मुलांच्या डोळ्यात डोळे घालून नीट पेपरफुटीबद्दल आक्रोश करतील ? त्यांना नैतिक अधिकार आहे ?

पक्षीय राजकारण हा रोजच्या जगण्यापेक्षा वेगळा विषय असायला हवा होता, पण गेल्या बारा वर्षांपासून पक्षीय राजकारण, धर्मांधता हातात हात घालून नंगा नाच करत आहेत आणि सर्वसामान्य जीवन बरबाद करून टाकत आहेत.

धर्मांधता पसरवून देशाची वाट लावण्यात आली आहे, त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांचे भवितव्य अंधारमय झालेले आहे. कायद्यासमोर सर्वच समान असायला हवेत, आम्ही अशाच देशाची निर्मिती करण्याची शपथ घेतलेली आहे संविधान स्वीकारून ! पण आता देशातील वातावरण दूषित करून टाकण्यात आलं आहे.

आज देश आर्थिक संकटात आहे, आजही आपल्याला जागं व्हायला हवं. सरकारने काही आवाहन केलं आहे ते पाळायला हवं, पण त्याचबरोबर असे आवाहन करण्याची वेळ का आली याबाबत सरकारला जाबही विचारायला हवा. आपल्या जुनाट रानटी जगात परत जायचं नसेल तर जात-धर्म यांच्या नावाने नागरीकांच्या विभागण्या करण्याची मअमृतकालीन पद्धतफआता आटोपती घ्यायला हवी !!

बंगालमध्ये तर बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर गोवंशाची कुर्बाणी न देण्याची मुसलमानांनी घोषणा करताच हिंदू गोपालांनी कुर्बाणीसाठी गोवंश घेण्याची विनंती करण्यास सुरूवात केली आहे. आपला देश हा असा आहे. एकमेकांवर एकमेकांचे पोट अवलंबून आहे, एकमेकांचे व्यवहार एकमेकांशी संबंधित आहेत !!!

**संदीप तेंडोलकर**

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# चला! देशापुढे महाराष्ट्राच्या बचतीचा आदर्श ठेवूया!

ज्या ज्या वेळी देशावर संकट येते, त्या त्या वेळी महाराष्ट्र हा दिल्लीच्या मदतीला धावून जातो. "हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला" ही महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांपासूनची आपली भूमिका आजही तितकीच जिवंत आहे. युद्ध असो, टंचाई असो, महापूर असो की महामारी-महाराष्ट्राने प्रत्येक संकटात देशाच्या पाठीशी उभे राहत मदतीचा नवा आदर्श निर्माण केला आहे. पश्चिम आशियातील वाढते तणाव आणि त्यातून निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर आज देश पुन्हा एका मोठ्या आव्हानासमोर उभा आहे. या संकटाचा कालावधी किती असेल हे आपल्या हातात नसले, तरी या अशा काळात संयम, शिस्त आणि बचत यामधून देशाच्या अर्थकारणाला बळ देण्याचे मोठे काम महाराष्ट्र करु शकतो.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात सर्वप्रथम आवाहन केले. त्यांनी देशवासियांना केलेले आवाहन हे केवळ खर्च कमी करण्याचे नाही, तर राष्ट्रहितासाठी जीवनशैली बदलण्याचे आहे. मजितकी बचत, तितकी राष्ट्रसेवाफ हा संदेश त्यांनी अत्यंत स्पष्टपणे दिला आहे. अनावश्यक इंधन वापर टाळणे, सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करणे, "वर्क फ्रॉम होम'ला प्रोत्साहन देणे, स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार वाढवणे, रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करणे, ऊर्जा बचत करणे अशा अनेक बाबींवर त्यांनी भर दिला. या सूचनांचा विचार करता महाराष्ट्र शासनानेही तातडीने व्यापक उपाययोजनांची अंमलबजावणी सुरु केली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतःच्या कृतीतून या संदेशाला विश्वासार्हता दिली आहे. विधान भवनात त्यांनी स्वतः दुचाकी चालवत केलेला प्रवेश हा केवळ प्रतिकात्मक नव्हता; तो प्रशासन आणि समाजाला दिलेला स्पष्ट संदेश होता. बचत ही फक्त भाषणातली गोष्ट नसून ती आचरणात उतरली पाहिजे. बंगळुरु येथील कार्यक्रमासाठी त्यांनी खासगी वा चार्टर्ड विमानाऐवजी प्रवासी विमानाने प्रवास केला, हीदेखील त्याच विचारसरणीची प्रचिती होती. नेतृत्व जेव्हा स्वतः उदाहरण घालून देते, तेव्हा समाज अधिक वेगाने बदल स्वीकारतो. त्यामुळे येत्या काळात नेतृत्वाचा संदेश तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कसब प्रशासनाला दाखवायचे आहे. तर अगदी गाव पातळीवरुन शिस्तीत सूचनांची अंमलबाजवणी करायची आहे.

राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेला या परिस्थितीत काय करावे. या संदर्भातील सुस्पष्ट आदेश दिले आहेत. राज्य शासनाने जारी केलेल्या सूचनांमध्ये अनेक महत्त्वाच्या उपाययोजना समाविष्ट आहेत. शासकीय अधिकाऱ्यांचे अनावश्यक परदेश दौरे स्थगित करण्यात आले आहेत. कार्यालयीन कामासाठी वाहनांचा कमीत कमी




वापर, शक्य असल्यास कारपूलिंग, सार्वजनिक वाहतुकीचा वापर आणि आठवड्यातून एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या सूचनांमधून केवळ इंधन बचतच नव्हे, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचाही संदेश दिला जात आहे.

आजच्या काळात ऊर्जा बचत हीच खरी राष्ट्रभक्ती ठरत आहे. शासनाने सरकारी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करण्याचे निर्देश दिले आहेत. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणा आणि संगणक बंद ठेवण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली आहे. वातानुकूलन यंत्रणांचे तापमान नियंत्रित ठेवण्याचा निर्णयही त्याचाच भाग आहे. प्रत्येक युनिट वीज वाचवणे म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेवरील भार कमी करणे, ही भावना आता रुजवली जात आहे.

ऊर्जेच्या पर्यायी साधनांवरही शासनाने विशेष भर दिला आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत घराघरात सौरऊर्जा पोहोचवण्याचा प्रयत्न अधिक वेगाने सुरू आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी चार्जिंग स्टेशन उभारणीस गती दिली जात आहे. पीएनजीच्या वापराला चालना देण्यासाठी मोठ्या शहरांतील हॉटेल्स आणि रेस्टॉरंट्सना प्रोत्साहन दिले जात आहे. ही केवळ बचतीची नव्हे, तर भविष्यातील शाश्वत विकासाची दिशा आहे.

शासनाने डिजिटल आणि ऑनलाइन पद्धतींचा वापर वाढवण्यालाही प्राधान्य दिले आहे. मंत्रालयीन, विभागीय आणि जिल्हास्तरीय बैठका शक्य तितक्या व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे वेळ, इंधन आणि आर्थिक संसाधनांची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कार्यालयीन कार्यपद्धती अधिक स्मार्ट आणि मितव्ययी बनवण्याची ही योग्य वेळ आहे.

बचतीचा हा विचार केवळ शासनापुरता मर्यादित राहता कामा नये. समाजातील प्रत्येक घटकाने त्यात सहभाग घेणे आवश्यक आहे. घरातील अनावश्यक वीज वापर कमी करणे, खासगी वाहनाऐवजी सार्वजनिक वाहतूक वापरणे, स्थानिक आणि स्वदेशी वस्तूंना प्राधान्य देणे, अन्नाची नासाडी टाळणे, पाण्याचा संयमाने वापर करणे, या छोट्या वाटणाऱ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम मोठा असतो. राष्ट्रनिर्मिती ही फक्त सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव आता अधिक दृढ करण्याची वेळ आली आहे.

कृषी क्षेत्रातही बचत आणि शाश्वततेचा विचार पुढे येत आहे. रासायनिक खतांचा अतिरेक कमी करून नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यावर शासनाचा भर आहे. माती परीक्षण, पिकनिहाय खतांचा वापर आणि योग्य कृषी व्यवस्थापन याद्वारे खर्च कमी करताना उत्पादनक्षमता टिकवण्याचा प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत राहिली तर देशाची आर्थिक घडीही अधिक सक्षम राहते, हे महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे महाराष्ट्राने सुरुवात केली आहे. यातून एक घडी बसेल. यासाठी सर्वसामान्य नागरिकांचा प्रतिसाद महत्त्वाचा आहे.

महाराष्ट्राची परंपरा ही फक्त संघर्षाची नाही, तर संकटावर मात करत देशाला दिशा देण्याची आहे. सहकार चळवळ असो, उद्योगधंद्यांची प्रगती असो किंवा सामाजिक बांधिलकी, महाराष्ट्राने नेहमीच देशाला आदर्श दिला आहे. आज पुन्हा एकदा तशीच वेळ आली आहे. बचत, संयम आणि जबाबदारी या तीन सूत्रांवर महाराष्ट्र चालला, तर देशासमोर एक नवा आदर्श उभा राहू शकतो.

आज गरज आहे ती केवळ घोषणांची नाही, तर कृतीची. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने सुरू केलेली ही मोहीम प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचली पाहिजे. गावपातळीपासून शहरांपर्यंत, विद्यार्थ्यांपासून अधिकाऱ्यांपर्यंत आणि शेतकऱ्यांपासून उद्योगजगतापर्यंत सर्वांनी या बचतीच्या यज्ञात आपला सहभाग नोंदवला, तर महाराष्ट्र पुन्हा एकदा देशासाठी प्रेरणास्थान ठरेल.

कारण संकटे येत राहतातः पण संकटाच्या काळात देशासाठी उभा राहणारा महाराष्ट्र हा नेहमीच अधिक मोठा दिसतो. महाराष्ट्राचे दातृत्व जसे मोठे आहे. तसेच राज्याचे कर्तृत्व आणि जबाबदारीही महत्त्वाची आहे. अशा परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून पुढे येऊ या ! प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देवूया ! देशाला आत्मनिर्भर आणि आणखी मजबूत करुया !

**-प्रवीण टाके,**
उपसंचालक (माहिती)विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर
९७०२८५८७७७

# ओबीसींचा मोर्चा ५ जून रोजी एसडीओ कार्यालयावर धडकणार



**देसाईगंज:-** संख्या, आमचा हक्क, आमचा सन्मान आणि जनगणनेत स्वतंत्र कॉलम आमचा हक्क, अशी गर्जना करत ओबीसी समाजाचे ज्वलंत प्रश्न व हक्कांसाठी येत्या ५ जून रोजी देसाईगंज उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार असल्याची माहिती तालुका ओबीसी समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी २४ मे रोजी माता मंदिर सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

देशात जनगणनेची प्रक्रिया सुरू झाली असूनही, त्यात अद्याप बहुसंख्य असलेल्या ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलम (रकाना) देण्यात आलेला नाही. हा समाजाच्या घटनात्मक हक्कांवर गदा आणणारा प्रकार आहे. जोपर्यंत जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम दिला जात नाही, तोपर्यंत या पक्षपाती जनगणनेवर पूर्णपणे बहिष्कार टाकण्याचा महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय समाजबांधवानी एकमताने घेत आहे. आपल्या अस्तित्वाची आणि संख्येची योग्य नोंद व्हावी, यासाठी हा लढा अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

केवळ बहिष्कारापुरते मर्यादित न राहता, या हक्काच्या लढ्याला अधिक धारदार बनवण्यासाठी आणि प्रशासनाला जाग आणण्यासाठी पुढील रणनीतीची घोषणा करण्यात आली आहे. मोर्चात जिल्ह्यातील व तालुक्यातील समस्त ओबीसी बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन तालुका ओबीसी समाज संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

पत्रकारपरिषदेला संघटनेचे अध्यक्ष लोकमान्य बरडे, ज्ञानदेव पिलारे, माणिक पिलारे, विलास ठाकरे, चक्रधर पारधी, धनपाल मिसार, प्रा. दामोधर शिंगाडे नरेश चौधरी, ज्ञानेश्वर कवासे सागर वाढई, प्रदीप तुपट सतीश खरकाटे, उमेश राऊत उमेश ढोरे आदी समाजबांधव उपस्थित होते.

# अतिउष्णतेमुळे वाघांचे आक्रमक वर्तन, पाणवठ्याच्या शोधात जंगलातून गावाकडे

**चंद्रपूरः**-जिल्ह्यातील वनपरिक्षेत्रात वाढत असलेल्या वाघ-मानव संघर्षामागे केवळ ङ्गनरभक्षकफ प्रवृत्ती नसून तीव्र उष्णतेमुळे वाघांच्या शरीर आणि वर्तनावर होणारे परिणाम कारणीभूत असल्याचे मत वन्यजीव तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.उन्हाळ्यात तापमान ४५ ते ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहाेचत असल्याने वाघांमध्ये ङ्गहायपरथर्मियाफ अर्थात अतिउष्णतेमुळे निर्माण होणारा ताण वाढत असून त्यातून आक्रमक वर्तनाच्या घटना घडत असल्याचे सांगितले जात आहे.



सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाहीच्या जंगलात वाघिणीने चार महिलांना ठार केल्यानंतर ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पशुवैद्यकीय अधिकारी तथा जलद बचाव पथक प्रमुख डॉ. रविकांत खोब्रागडे यांनी यासंदर्भात वैज्ञानिक स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या मते, वाघ हे ङ्गहोमियोथर्मिकफ प्राणी असल्याने शरीराचे अंतर्गत तापमान स्थिर ठेवणे त्यांच्यासाठी अत्यावश्यक असते. मात्र, मानवांप्रमाणे त्यांच्या शरीरात घामग्रंथी नसल्याने उष्णतेचा निचरा करण्यासाठी त्यांना प्रामुख्याने पाणवठे आणि सावलीवर अवलंबून राहावे लागते.डॉ. खोब्रागडे यांच्या मते, तापमान अतिशय वाढल्यास वाघांच्या शरीरातील उष्णता बाहेर टाकण्याची क्षमता कमी होते आणि ङ्गहायपरथर्मियाफ निर्माण होतो. यामुळे मध्यवर्ती मज्जासंस्थेवर ताण येऊन शरीरात ङ्गकॉर्टिसोलफ आणि ङ्गअॅड्रेनालिनफसारख्या तणाव निर्माण करणाऱ्या हार्मोन्सचे प्रमाण वाढते. परिणामी वाघ चिडचिडे, अस्वस्थ आणि अधिक आक्रमक बनतात.

उन्हाळ्यात तेंदूपत्ता संकलनासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक जंगलात जातात. विशेष म्हणजे, वाघ उन्हापासून बचावासाठी ज्या ओढे, सावलीचे भाग किंवा घनदाट जंगल परिसरात आश्रय घेतात, त्याच भागात तेंदूपत्ता मोठ्या प्रमाणावर आढळतो. त्यामुळे मानव आणि वाघ यांचा थेट संपर्क वाढत असल्याचे निरीक्षण आहे.तेंदूपत्ता गोळा करताना महिला आणि मजूर खाली वाकून काम करतात. वाघाची दृष्टी हालचाली आणि आकृतीवर आधारित असल्याने वाकलेली मानवी आकृती ही चारपायी प्राण्यासारखी भासू शकते. आधीच उष्णतेमुळे तणावाखाली असलेला वाघ अशा परिस्थितीत तात्काळ हल्ला करण्याची शक्यता वाढते, असेही डॉ. खोब्रागडे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, जंगलातील नैसर्गिक पाणवठे आटत असल्याने वाघांचा मानवी वस्त्यांकडे वावर वाढत आहे. विशेषतः तरुण आणि भटक्या वाघांचा मानवांशी संपर्क अधिक वाढत असल्याचे वन विभागाचे निरीक्षण आहे. वाढती वाघसंख्या, कमी होत चाललेले अधिवास आणि तीव्र उन्हाळा यामुळे चंद्रपूर आणि ब्रह्मपुरी परिसरातील मानव-वन्यजीव संघर्ष अधिक गंभीर बनत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे

# आम्ही नेहमी "ओबीसी एकता" आणि "ओबीसी संघर्ष" बद्दल आग्रही का असतो?

भारतातील सामाजिक रचना अनेक शतकांपासून जातीय विषमतेवर आधारित राहिली आहे. शिक्षण, सत्ता, जमीन, नोकऱ्या आणि निर्णयप्रक्रियेत काही घटकांना अधिक संधी मिळाल्या, तर अनेक घटक मागे राहिले. ओबीसी प्रवर्ग हा त्या मागे राहिलेल्या मोठ्या घटकांपैकी एक आहे. म्हणूनच "ओबीसी एकता" आणि "ओबीसी संघर्ष" हा विषय केवळ राजकारणाचा नसून सामाजिक न्याय, समान संधी आणि स्वाभिमानाचा विषय आहे.

हा प्रवर्ग संख्येने मोठा असला तरी अनेकदा तो जाती, उपजाती, प्रांत आणि स्थानिक मतभेदांमध्ये विभागला गेला. या विखुरलेल्या अवस्थेमुळे सामूहिक ताकद कमी झाली. जेव्हा एकता नसते, तेव्हा प्रश्नांकडे गंभीरपणे पाहिले जात नाही. म्हणूनच ओबीसी एकतेची गरज सतत अधोरेखित केली जाते.

आपली एकता म्हणजे आपल्याला कुणाच्याही विरोधात उभे करण्यासाठी वापरलेले शस्त्र नसावे, तर एकता म्हणजे आपल्या हक्कांसाठी संविधानिक मार्गाने संघटितपणे आवाज उठवणे होय.

**भारतीय संविधान आणि ओबीसी हक्क**

भारतीय संविधानातील अनुच्छेद १५(४), १५(५), १६(४) आणि ३४० अंतर्गत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांना शिक्षण, नोकरी आणि प्रतिनिधित्वासाठी विशेष तरतुदी व आरक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. त्यामुळे आरक्षण हे कोणावर उपकार नसून संविधानिक हक्क आणि समान संधीचे साधन आहे.

आरक्षणाच्या मुद्द्यावर स्वतःच्या प्रवर्गातील लोकांशी किंवा बहुजन समाजातील इतर घटकांशी संघर्ष करण्यापेक्षा, संविधानाने दिलेल्या अधिकारांचा आपल्या लोकांच्या प्रगतीसाठी अधिक प्रभावीपणे कसा उपयोग करता येईल यावर लक्ष केंद्रित करणे अधिक आवश्यक आहे.

**शिक्षण, रोजगार आणि संघर्षाची गरज**

आजही ग्रामीण भागातील अनेक ओबीसी विद्यार्थी शिक्षण, स्पर्धा परीक्षा, आर्थिक साधने आणि योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे मागे पडतात. अनेक तरुण बेरोजगारी, संधींची कमतरता आणि सामाजिक दुर्लक्ष यांचा सामना करतात. त्यामुळे ओबीसी संघर्ष म्हणजे केवळ आंदोलन किंवा घोषणा नसून शिक्षण, रोजगार, सन्मान आणि संविधानिक हक्क टिकवण्यासाठीचा संघर्ष आहे.

**जातनिहाय जनगणना का महत्त्वाची आहे ?**

आजच्या काळात ओबीसींची जातनिहाय जनगणना (Caste Census) होणे आणि ती स्वतंत्र कॉलमसहित होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण अचूक आकडेवारीशिवाय कोणत्याही प्रवर्गाचे वास्तव प्रतिनिधित्व, सामाजिक स्थिती, शैक्षणिक प्रगती आणि आर्थिक परिस्थिती समजू शकत नाही.




बावन्न टक्क्यांहून अधिक लोकसंख्या असलेला हा भारतीय प्रवर्ग आजही अधिकृत जातनिहाय जनगणनेपासून वंचित आहे, यापेक्षा दुःखद बाब दुसरी असू शकत नाही. आपल्या हक्क, अधिकार, प्रतिनिधित्व आणि धोरणात्मक न्यायासाठी लढताना नेमका आकडा असणे अत्यंत आवश्यक असते. त्यामुळे सर्व ओबीसी प्रवर्गांनी जातनिहाय जनगणनेच्या प्रश्नावर सातत्याने जागरूक आणि आग्रही राहणे गरजेचे आहे.

जर हा प्रवर्ग एकसंघ राहिला नाही, तर त्याचा सर्वात मोठा परिणाम भावी पिढीवर होईल. म्हणूनच आजची एकता ही उद्याच्या सुरक्षित आणि सन्मानजनक भविष्याशी जोडलेली आहे.

**राजकारण आणि ओबीसी समाज**

ओबीसी प्रवर्गाने कोणत्याही राजकीय पक्षाकडे केवळ भावनिक दृष्टीने न पाहता, त्या पक्षाची ओबीसींबाबतची भूमिका, धोरणे, प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्यायाबद्दलची प्रामाणिकता समजून घेतली पाहिजे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येचा प्रवर्ग असूनही त्यांच्या प्रमाणानुसार प्रतिनिधित्व दिले जात नसेल किंवा त्यांच्या प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवला जात नसेल, तर त्या परिस्थितीचा गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे.

विशेषतः ओबीसी तरुणांनी केवळ राजकीय लोकांच्या मागे लागून स्वतःचे आयुष्य वाया घालवू नये. कोणत्याही पक्षाला समर्थन देण्यापूर्वी त्या पक्षाचा हेतू, ओबीसींबाबतचे धोरण, ओबीसी नेतृत्वाला दिली जाणारी संधी आणि सामाजिक न्यायाबद्दलची भूमिका यांचा अभ्यास असणे आवश्यक आहे.

**भावनिक आणि दिशाभूल करणाऱ्या राजकारणापासून सावध राहा**

प्रत्येक ओबीसी घटकाने आपला सामाजिक आणि राजकीय इतिहास समजून घेतला पाहिजे. कोणत्या विचारांनी ओबीसींच्या हक्कांना समर्थन दिले आणि कोणत्या प्रवाहांनी विरोध केला हे समजून घेणे गरजेचे आहे.

ओबीसी प्रवर्गाला मागे ठेवण्यासाठी किंवा केवळ मतबँक म्हणून वापरण्यासाठी कोणत्या प्रकारचे राजकीय आणि सामाजिक डावपेच खेळले गेले, हेही समजून घेणे आवश्यक आहे.

इतिहास, परंपरा, जात, धर्म, राजकारण किंवा सामाजिक व्यवस्थेच्या नावाखाली समाजातील काही विघातक प्रवृत्ती लोकांना विभागण्याचा आणि भावनिक पातळीवर नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात. विशेषतः ओबीसी प्रवर्गाचे भावनिक आधारावर मॅनिप्युलेशन करणे अनेकदा सोपे जाते, अशी व्यवस्थेची रचना दीर्घकाळ तयार करण्यात आली आहे.

समाजात धर्माधारित द्वेष निर्माण करणे, सतत हिंदू-मुस्लिम वादांमध्ये तरुणांना अडकवून ठेवणे, ओबीसी-मराठा वाद निर्माण करणे, उगाचच कुठलेही अश्मयुगीन ऋठ काढून ओबीसींना त्यांच्या मूळ प्रश्नांपासून भटकविणे आणि त्यांच्या भावनांचा राजकीय फायद्यासाठी उपयोग करून घेणे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे ओबीसी तरुणांनी भावनिक आणि दिशाभूल करणाऱ्या राजकारणापासून सावध राहून शिक्षण, रोजगार, संविधानिक हक्क, प्रतिनिधित्व आणि सामाजिक प्रगती यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**ओबीसी एकता म्हणजे सर्वांचा सहभाग**

ओबीसी एकता ही केवळ मोठ्या जातींपुरती मर्यादित नसावी. मायक्रो ओबीसी घटकांनाही सोबत घेऊन पुढे जाणे आवश्यक आहे. तेली, माळी, कुणबी किंवा इतर जातींच्या मर्यादित चौकटीत अडकून न राहता, ङ्गओबीसीङ्ग ही आपली संविधानिक ओळख म्हणून स्वीकारून एकत्र येणे ही काळाची गरज आहे.

आपल्याच प्रवर्गातील जाती-जातींमध्ये जर आपण सतत विखुरले गेलो, एकमेकांशी भांडत राहिलो, तर कदाचित आपण आपल्या जातीच्या नावाने पुढे जाऊ; पण समाज म्हणून आणि माणूस म्हणून मात्र आपण नक्कीच हरू. म्हणूनच परस्पर द्वेष, मतभेद आणि जातीय अहंकार बाजूला ठेवून एकमेकांना समजून घेणे, सोबत घेऊन चालणे आणि सामूहिक प्रगतीसाठी काम करणे आवश्यक आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण, समता आणि सामाजिक न्यायासाठी दिलेला विचार हा ओबीसी संघर्षाची प्रेरणा आहे.

आज ओबीसी प्रवर्ग योग्य दिशेने, प्रामाणिकपणे आणि फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेसह पुढे गेला, तर या प्रवर्गाला प्रगतीपासून रोखण्याची ताकद कोणामध्येही नाही.

**अॅड.समीक्षा गणेशे (सराटकर)**

# प्रतिबंधित बफर क्षेत्रात तेंदूपत्ता कंत्राटदारांचा डल्ला

**गोंदिया:–** नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात वाढ करण्यात आली आहे. दरम्यान, वन विभागाच्या नियमानुसार अभयारण्य व राष्ट्रीय उद्यान यांचे गाभा क्षेत्रापासून ३ कि. मी. च्या परिघात तेंदूपाने संकलन करण्यावर प्रतिबंध लावण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर काही संकलन केंद्र रद्द केले असून प्रतिबंधित क्षेत्रातून तेंदूपत्ता संकलन बंद करण्याचे निर्देश आहे. असे असताना तेंदूपत्ता ठेकेदारांकडून संबंधित वन विभागाच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून रद्द केलेल्या केंद्रासह गाभा क्षेत्राच्या ३ किमी परिघात संकलन केंद्र उभारून तेंदूपत्ता संकलन केले जात असल्याचा प्रकार तिरोडा व गोरेगाव वनपरिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या



बफर झोनमध्ये पुढे आला आहे. असे असले तरी संबंधित वन–क्षेत्रातील अधिकाऱ्यांकडून याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभागाच्या टेंडर नोटीस २०२६, अन्वये प्रसिध्द निविदा सुचनेतील अटी व शर्तीनुसार अभयारण्य / राष्ट्रीय उद्यान यांचे गाभा क्षेत्रापासून ३ कि. मी. च्या परिघात तेंदूपाने संकलन केंद्र उघडण्यास मनाई आहे. याबाबत वन विभागाच्या वतीने

यापूर्वीच संबंधित वनपरिक्षेत्र कार्यालयाला आवश्यक सुचना देण्यात आल्या आहे. उंदु दीहूर्त असताना वनपरिक्षेत्र तिरोडा अंतर्गत घोटी मंगेझरी, बोदलकसा, आलेझरी, पिंडकेपार, बेरडीपार, भजेपार, मारेगाव, लोणारा व नवेझरी येथे तसेच वनपरिक्षेत्र गोरेगाव अंतर्गत जांभुळपाणी, राम टोला, मलपुरी, हिरापूर, बोलूंदा व आसलपानी वनक्षेत्रात तेंदूपत्ता ठेकेदाराकडून अवैधरित्या तेंदुपाने संकलन केंद्र उभारुन तेंदूपत्ता संकलन केले जात आहे. हा सर्व प्रकार संबंधित वनपरिक्षेत्रांतर्गत अधिकाऱ्यांच्या नजरेखालून सुरू असून यात मोठ्या प्रमाणात देवाण–घेवाण झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

विशेष म्हणजे, काही वन्यप्रेमींनी तिरोडा व गोरेगाव वनपरिक्षेत्रातील प्रतिबंधित जंगलात अवैधरित्यातील तेंदूपत्ता संकलन होत असल्याची तक्रार उपवनसंरक्षक यांच्याकडे केली असता उपवनसंरक्षक यांनी ५ मे रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) तिरोडा व गोरेगाव यांना कार्यक्षेत्रांतर्गत अवैधरित्या सुरु असलेले तेंदूपाने संकलन केंद्र तात्काळ बंद करून संबंधीतावर पीओआर जारी करून नियमानुसार योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश पत्राद्वारे दिले आहे. दोन आठवडे लोटूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून या पत्राला केराची टोपली दाखवत कसलीच कारवाई करण्यात आली नाही. तेव्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून यावर कोणती कारवाई होते याकडे वन्यप्रेमींचे लक्ष लागले आहे.

# जि.प.च्या कोट्यवधीच्या मालमत्तेवर वनविभागाची टाच

**गोंदिया :–** जिल्हा परिषदेच्या कोट्यवधीच्या मालमत्ता वनविभागाच्या ताब्यात असल्याचे सदृश्य चित्र जिल्ह्यात निर्माण झाले आहे. कोट्यवधी रुपयांच्या मालम त्तांवर वनविभागाने अक्षरशा कब्जा केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शाळांची मैदाने, ग्राम पंचायत जागा, मालगुजारी तलाव, दवाखाने, बाजार जागा, स्मशानभूमी तसेच हजारो हेक्टर जमीन आजही तन विभागाच्या नोंदीत असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचे हात बांधले गेले आहेत. या प्रकारामुळे जिल्ह्यातील विकासकामांचा गळाच घोटला जात आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया उमटू लागली आहे.

भंडारा जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या लघुसिंचन विभागाच्या मालगुजारी तलावांच्या सातबाऱ्यावर मवृक्षांनी आच्छादित जंगलफ



अशी नोंद करून सन १९८० च्या वन अधिनियमाच्या नाव–ाखाली मोठ्या प्रमाणावर जमीन वन विभागाच्या ताब्यात घेण्यात आली. मात्र त्यानंतर ही जमीन परत मिळविण्यासाठी प्रशासनाने कोणतीही गंभीर पावले उचलली नाहीत. त्यामुळे शासनाच्या मालमत्तेवरच शासन विभागांचा संघर्ष सुरू असल्याची हास्यास्पद स्थिती निर्माण झाली आहे. यानंतर भंडारा जिल्ह्याचे विभाजन होवून १ मे १९९९ रोजी स्वतंत्र गोंदिया जिल्ह्याची निर्मिती झाली.

यादरम्यान जिल्ह्यातील तिरोडा, काटी, दांडेगाव, रावणवाडी, बटाणा, खमारी, फुलचूर, अर्जुनी–मोरगाव, नवेगावबांध, सालेकसा, गोरेगाव, आमगावत सडक अर्जुनी परिसरातील हजारो हेक्टर जमीन वन विभागाच्या नोंदीत असल्याचे समोर आले आहे. अनेक ठिकाणी

ग्रामपंचायत इमारती, जिल्हा परिषद शाळांची मैदाने, शहीद स्मारके, चराई क्षेत्र, बाजार जागा आणि तलावांवरही वन विभागाचा दावा असल्याने ग्रामविकासाची कामे रखडली आहेत. दरम्यान, वन विभागाकडून या मालमत्तांचा फेरफार करून त्या तातडीने जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्यात याव्यात, यासाठी विशेष प्रस्ताव जिल्हा परिषद सभेत सादर करून प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी जिल्हा जनकल्याण संघर्ष समितीचे अध्यक्ष अंकेश तिवारी यांनी केली आहे

# पं.स.मार्गवरील अतिक्रमण ठरतेय डोकेदुखी



**आमगाव :–** शहरातील वर्दळीचा रस्ता असलेल्या पंचायत समिती मार्गावर सध्या वाहतूक कोडींची समस्या गंभीर बनली आहे. येथे दिवसभर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे पाहायला मिळते. ज्यामुळे नागरिकांना मोठ्या मनस्ता–पाला सामोरे जावे लागत असून नागरिकांची डोकेदुखी वाढली आहे.

कधीकाळी अत्यंत सुरक्षित म्हणून ओळखला जाणारा हा मार्ग आज डोकेदुखी ठरत आहे. रोजचा झालेला हा त्रास लोकांना नकोसा झाला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या दुकानदारांनी दुकानासमोर अतिक्रमण केले आहे. ग्राहक आपली वाहने रस्त्यावरच उभी करत असल्याने रस्ता अरुंद होऊन वाहतुकीला अडथळा निर्माण होतो.

या भागात वाहतूक पोलिसांचे नियंत्रण नसल्याने दररोज अर्धा ते एक तास गोंधळ उडत असल्याचे चित्र आहे. पंचायत समिती मार्गावर आदर्श महाविद्यालय असल्याने वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका विद्यार्थ्यांना सुद्धा बसत आहे. किडंगीपार मार्गावर कालव्यापर्यंत येथील दुकानदारांनी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे होणारी वाहतूक कोंडी ही दररोजची डोकेदुखी झाली आहे.

प्रशासनाने या रस्त्यावरील स्थायी, अस्थायी अतिक्रमण तत्काळ हटवावे तसेच आदर्श विद्यालयाच्या गल्लीतून येणाऱ्या चारचाकी वाहनांवर निर्बंध घालण्याची गरज आहे, जेणेकरून ही कोंडी सुटेल. नगर परिषद प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन वाहतूक सुरळीत करण्यासाठी कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या उन्हाळी शिबिरातून करिअरच्या नव्या संधी खुल्या : जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले

## विद्यार्थ्यांनी एआय ते पारंपारिक कलांचे उन्हाळी शिबिरात घेतले प्रशिक्षण



**गोंदिया :–** देवरी येथे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या उन्हाळी शिबिराच्या समारोप कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांनी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अशा शिबिरांमुळे करिअरच्या नव्या संधी उपलब्ध होत असल्याचे सांगितले.

या शिबिरात विद्यार्थ्यांना महिनाभर विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये गोंडी चित्रकला, मेहंदी, क्ले आर्ट, बॉटल आर्ट, रांगोळी, पेंटिंग, बांबू हस्तकला तसेच एआय आणि रोबोटिक्ससारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यात आले. हे शिबिर बोरगाव/बाजार येथील शासकीय आश्रम शाळेत पार पडले.

समारोप कार्यक्रम पालकांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय गीत, राज्य गीत आणि गोंडी स्वागत गीताने झाली.

जिल्हाधिकारी म्हणाले की, योग्य मार्गदर्शन आणि प्रशिक्षण मिळाल्यास आदिवासी भागा–तील विद्यार्थीही मुख्य प्रव–ाहात येऊन देशाच्या विकासात योगदान देऊ शकतात. या शिबिरातून विद्यार्थ्यांना पारंपरिक संस्कृतीसोबत आधुनिक कौशल्ये शिकण्याची संधी मिळाली, ही उल्लेखनीय बाब असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ही कौशल्ये विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात करिअर किंवा छंद म्हणून उपयोगी पडतील, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी उमेश काशिद यांनी केले. शासन आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कटिबद्ध असून आश्रम शाळांमध्ये सकारात्मक बदल होत असल्याचे त्यांनी सांगितले.

समारोप सोहळ्यात विद्यार्थ्यांनी भरतनाट्यम, सावित्रीबाई फुले आणि फातिमा शेख यांना वंदन करणारे नृत्य, स्तवन, भजन, आदिवासी नृत्य तसेच वाद्य सादरीकरण केले. या सादरीकरणांनी उपस्थित पालक भारावून गेले.

विशेष आकर्षण म्हणून एअर शो आयोजित करण्यात आला होता. यामध्ये लढाऊ विमाने आणि हेलिकॉप्टरच्या प्रतिकृतींचे स्टंट सादर करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांनी मल्लखांबचे कौशल्यपूर्ण सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या शेवटी विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पारितोषिके आणि प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले.



# अभिजित घोरपडे यांची गोंदिया येथे अपर जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती

**गोंदिया :–** अभिजित घोरपडे हे गोंदिया येथे अपर जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाले. यापूर्वी ते राज्य वातावरणीय कृती कक्ष, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई येथे संचालक म्हणून कार्यरत होते. महसूल व वन विभागाच्या दिनांक १५ मे २०२६ रोजीच्या शासन आदेशानुसार अपर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीनंतर ही नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री. घोरपडे यांनी नुकतेच गोंदिया येथे अपर जिल्हाधिकारी म्हणून पदभार स्वीकारला असून त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्हा प्रशासनाच्या कामकाजाला अधिक बळ मिळणार आहे. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा लाभ जिल्ह्याच्या विकासकामांना होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# एका वर्षात जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील रस्त्याला भेगा

**गोंदिया :–** वर्षभऱ्यापूर्वी जिल्हाधिकारी कार्यालय ते आम्बाटोली (फुलचुर) हा सिमेंट रस्ता तयार करण्यात आला. परंतु एका वर्षातच या रस्त्याला भेगा पडल्यामुळे या रस्त्याच्या बांधकाम ावर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय ते आम्बाटोली –ग्रामीण पोलिस स्टेशन (फुलचुर) समोरील मार्ग हा सिमेंट रस्ता बांधकाम वर्ष २०२५ मध्ये पूर्ण करण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाने जवळपास एक कोटी रुपये खर्च करीत या बांधकामाचे कंत्राट शहरातील एका अग्रवाल नामक कंत्राटदाराला दिले. सदर सिमेंट रस्ता बांधकामाला एक वर्ष सुध्दा उलटले नाही तरीही या रस्त्याला मधोमध मोठ्या भेगा पडल्या आहेत. मोठ्या भेगा पडल्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे.

# काँग्रेस नेत्याच्या घराजवळ संशयितांचा वावर

**देवरी:–** शहरातील चिचगड रोड परिसरात शनिवारी मध्यरात्री घडलेल्या एक संशयास्पद प्रकाराम ुळे खळबळ उडाली. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या तथा जिल्हा परिषद सदस्या उषाताई शहारे यांच्या निवासस्थानाजवळ ९ ते १० संशयित युवक फिरताना आढळले. एका वृद्ध महिलेच्या सतर्कतेमुळे संभाव्य अनर्थ टळल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे.



माहितीनुसार, शनिवारी रात्री दोन ते अडीच वाजण्याच्या सुमारास देवरी नगर पंचायत प्रभाग क्रमांक १५ अंतर्गत चिचगड रोड परिसरात काही युवक संशयास्पद हालचाली करताना दिसले. यातील काही युवकांनी कथितरीत्या उषा–ताई शहारे यांच्या घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा आहे. याचवेळी शेजारी राहणाऱ्या एका वृद्ध महिलेने संशयित युवकांना पाहताच आरडाओरड केली. त्यामुळे युवकांनी घटनास्थळावरून अंधाराचा फायदा घेत पळ काढल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

विशेष म्हणजे, ही घटना देवरी पोलीस ठाण्यापासून काही अंतरावर असलेल्या मुख्य मार्गावर घडल्याने शहरातील रात्रीची सुरक्षा व्यवस्था आणि पोलीस गस्त यावर नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "पोलीस ठाण्याजवळच अशा घटना घडत असतील, तर सामान्य नागरिकांच्या सुर–क्षेचे काय?" असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# 'कोल्हापुरी बंधारा' निकामी

**देवरी :–** जनतेच्या घामाचा पैसा आणि शासनाचा लाखो रुपयांचा निधी अक्षरशः कसा मपाण्यातफजातो, याचा संतापजनक आणि विदारक नमुना देवरी जवळील डवकी नाल्यावर उघडकीस आला आहे. शेतकऱ्यांच्या शेतीला आणि जनावरांना ऐन उन्हाळ्यात पाणी मिळावे, या उदात्त हेतूने अवघ्या वर्षभरापूर्वी बांधण्यात आलेला कोल्हापुरी बंधारा आज पूर्णपणे कोरडाठाक

पडला आहे. प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि कंत्राटदाराच्या निकृष्ट कामामुळे हा बंधारा निरूपयोगी ठरला असून शोभेची वास्तु म्हणून राहिला आहे. यामुळे शेतकरी संतप्त झाले असून चौकशी करून त्या कंत्राटदाराचा परवाना तात्काळ रद्द करावा, अशी मागणी केली आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यालय कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर-४४२४०१**

**निविदा सुचना क्र.४७/२०२६-२७**

कार्यकारी अभियंता सा.बां. (आदि) विभाग, चंद्रपूर हे खालील कामाच्या मोहोरबंद निविदा ब–१ प्रपत्रामध्ये आदिवासी विकास विभागातील योग्य त्या स्थापत्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागवित आहे. कोरी निविदा प्रपत्र रकाना क्र.७ मध्ये दर्शविलेल्या तारखेपर्यंत कार्यकारी अभियंता सा.बां.(आदि) विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयातून कामकाजाचे दिवशी विहित किमत भरुन प्राप्त करुन घेता येईल. भरलेली निविदि प्रपत्र रकाना क्र.८ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिनांकास १७.०० वाजता किंवा कार्यकारी अभियंता सा.बां.(आदि) विभाग, चंद्रपूर हे कळवतील त्या दिनांकास व वेळेस मोहरबंद निविदा या कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा खरेदी केल्यानंतर खरेदी केल्याची पावती निविदे सोबत सादर करणे बंधनकारक राहील व कोरे निविदा प्रपत्र खरेदी केल्यावर निविदा प्रपत्र योग्य भरुन स्वतःची व साक्षिदाराची स्वाक्षरी सिलबंद लिफाफ्यात रकाना क्र.८ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापर्यंत दुपारी १५.०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) | बयाना रक्कम (रुपये) | कामाचा कालावधी | कंत्राटदाराची वर्गवारी निविदा प्रपत्राची किंमत) | कोरी निविदा प्राप्त करण्याचा कालावधी ठिकाण व दिनांक | भरलेली सिलबंद निविदा स्विकृतीचे ठिकाण व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | Special Repairs to Goverment Tribal Ashram School Borgaon Bajar Ta.Deori Dist Gondia | ८,४३,५९० | ९,००० | ३ महिने | वर्ग "६" व त्यावरील रू. कि.५९०/– | दि.२१.०५.२०२६ ते २८.०५.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.२८.०५.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| २ | Special Repairs to Goverment Tribal Ashram School Kadikasa Ta. Deori Dist Gondia | ८,४३,२२२ | ९,००० | ३ महिने | वर्ग "६" व त्यावरील रू. कि.५९०/– | दि.२१.०५.२०२६ ते २८.०५.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.२८.०५.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| ३ | Special Repairs to Goverment Tribal Ashram School Elda Ta. Deori Dist Gondia | ४,४३,५०९ | ९,००० | ३ महिने | वर्ग "६" व त्यावरील रू. कि.५९०/– | दि.२१.०५.२०२६ ते २८.०५.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.२८.०५.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| ४ | Special Repairs to Goverment Tribal Girls hostel Deori No 01 Tal:-Deori.Dist-Gondia | ४,७२,५२० | ५,००० | ३ महिने | वर्ग "७" व त्यावरील रू. कि.५९०/– | दि.२१.०५.२०२६ ते २८.०५.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.२८.०५.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| ५ | Special Repairs to Goverment Tribal Girls hostel Deori No 02 Tal:-Deori.Dist-Gondia | ५,०६,१०२ | ६,००० | ३ महिने | वर्ग "७" व त्यावरील रू. कि.५९०/– | दि.२१.०५.२०२६ ते २८.०५.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.२८.०५.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| ३ | Special Repairs to Goverment Tribal Boys Hostel Deori No 01 Tal:-Deori.Dist-Gondia | ४,२१,१९७ | ५,००० | ३ महिने | वर्ग "७" व त्यावरील रू. कि.५९०/– | दि.२१.०५.२०२६ ते २८.०५.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.२८.०५.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |
| ४ | Special Repairs to Goverment Tribal Boys hostel Arjuni Morgaon Tal:-Arjuni Morgaon.Dist-Gondia | ५,३९,८३३ | ६,००० | ३ महिने | वर्ग "७" व त्यावरील रू. कि.५९०/– | दि.२१.०५.२०२६ ते २८.०५.२०२६ का.अ. (आ.)विभाग चंद्रपूर यांचे कार्यालयात १५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत | दि.२८.०५.२०२६ रोजी दुपारी १७.०० वाजेपर्यंत का.अ. (आ.)विभाग,चंद्रपूर यांचे कार्यालयात |

**अटी व शर्ती:** १) खालील कारणांमुळे आपली निविदा रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.
१)१) निविदा प्रपत्राची सुस्पष्ट न दिसणारी प्रति २) अपूर्ण निविदा प्रपत्र (पान कमी असलेले) ३) निविदा पपत्रामध्ये कंत्राटदाराकडून छापील मजकूरामध्ये खोडतोङ व बदल करणे. ४) निविदेसोबत जोडण्यात येणारे आवश्यक कागदपत्र राजपत्रित अधिकाऱ्याकडून साक्षांकित न केलेले कागदपत्र व अपूर्ण कागदपत्रे ५) निविदा खरेदी केल्याची पावती निविदेसोबत सादर न करणे. ६; निविदेच्या लिफाफावर कामाचा संपूर्ण नाव व कंत्राटदाराचा संपूर्ण नाव पत्तेसहित व स्वाक्षरी न केलेले लिफाफे. ७) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट–१)१००/– स्टॅप पेपरवर लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात येत आहे. (टिपः– स्टॅपल केलेले लिफाफे स्विकारण्यात येणार नाही व सिलबंद लिफाफे सादर करावे.)
२) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये योग्य त्या वर्गात पंजीबद्ध असल्याबाबतचे अद्यावत पंजीयन साक्षांकित प्रत लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे अनिवार्य राहील.३) बयाना (इसारा) रक्कम शेडयूल बँकेच्या एक वर्षमुदतीचे टर्म डिपॉझीटच्या स्वरूपात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आ.) विभाग, चंद्रपूर यांचे नावे जोडणे आवश्यक आहे. किंवा शासन सा.बां.विभाग निर्णय दिनांक २०.०४.१९९८ नुसार नविन नियमाप्रमाणे आवश्यक रक्कम भरुन बयाना रक्कम भरण्यापासून सुट प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच साक्षांकित केलेले प्रमाणपत्र लिफाफा क्र.१ मध्ये निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे. ४) कामाची निविदा उघडण्याच्या दिनांकापासून ६० दिवस तथा कंत्राटदाराने लेखी सुचना देईपर्यंत विधीग्राह्य राहील. ५) निविदा विषयक सर्व साक्षांकित कागदपत्रे लिफाफा क्र.१ मध्ये सादर करावे व लिफाफा क्र.२ मध्ये भरलेली निविदा प्रपत्र सादर करावे.
प्रति: १) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर–४४२४०१ यांचे कार्यालयातील सुचना फलक
२) सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, नागपूर यांना माहितीस अग्रेषित.
जिमाका/गों/जाहि/२४/२०२६

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी)**
**विभाग चंद्रपूर**


# पल्स पोलिओ, नियमित लसीकरण व गाभा समितीबाबत जिल्हा टास्क फोर्स समितीची सभा

**गोंदिया :–** जिल्ह्यातील आरोग्य सेवांचा दर्जा अधिक सुधारण्यासाठी आणि विविध राष्ट्रीय आरोग्य मोहिमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले यांच्या अध्यक्षतेखाली दि.२२ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा टास्क फोर्स (उद्धऋ) समितीची बैठक पार पडली.



या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ.रोशन राऊत यांच्यासह संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत प्रामुख्याने खालील विषयांवर सविस्तर आढावा घेऊन जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले यांनी संबंधितांना आवश्यक निर्देश दिले.

**गाभा समितीबाबत आढावा :** बैठकीत जिल्हा गाभा समितीच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील माता व बाल आरोग्य सुधारणे, संस्थात्मक प्रसूतीचे प्रमाण वाढवणे, सॅम–मॅम बालकांचे वजन वाढविणे, कुपोषण आणि आरोग्य सेवांमधील तांत्रिक व व्यावहारीक त्रुटी तातडीने दूर करणे याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी सूचना दिल्या.

**राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रम :** राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रम ांतर्गत जिल्ह्यात गावोगावी नियमित लसीकरणाचे सेवासत्र आयोजित करावे. एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य विभागाने सुक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. विश–ेषतः दुर्गम, आदिवासी आणि संवेदनशील भागातील बालकांपर्यंत लसीकरण सेवा पोहोचवण्यावर विशेष भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

**पल्स पोलिओ मोहीम (२८ जून) :** आगामी २८ जून रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या पल्स पोलिओ मोहिमेच्या पुर्वतयारीचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला. मोहिमेच्या दिवशी जिल्ह्यातील ० ते ५ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना पोलिओ डोस देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी बस स्थानके, रेल्वे स्टेशन. विटा भट्टी आणि इतर सार्वजनिक ठिकाणी विशेष बुथ तयार करावेत, तसेच फिरत्या पथकांची स्थापना करावी अशा सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यात ९४०८९ बालके विश–ेषतः ० ते ५ वर्ष वयोगटातील सर्व बालकांसाठी १४७३ बुथचे नियोजन करण्यात आले असुन २९६७ आरोग्य कर्मचारी व २६५ पर्यवेक्षकांच्या मदतीने पल्स पोलिओ मोहिम यशस्वी करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर यांनी, सर्व संबंधित यंत्रणांनी आपापसात समन्वय ठेवून व गावागावात जनजागृती करून या आरोग्य मोहिमा शंभर टक्के यशस्वी कराव्यात, असे आवाहन केले.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार आणि माता व बालसंगोपन अधिकारी डॉ.रोशन राऊत यांनी मोहिमेच्या यशस्वीतेसाठी आरोग्य विभागाचा सुक्ष्म आराखडा तयार करण्यात आल्याचे सांगितले

# ओबीसी जातनिहाय जनगणनेचा निर्णय आधी घ्या

## मगच सहकार्य करू!; ओबीसी संघटनांचा जिल्हाधिकाऱ्यांकडे ठाम पवित्रा



■ गोंदिया येथील बैठकीत प्रशासनाचे सहकार्याचे आवाहन धुडकावले

■ बहिष्काराच्या भूमिकेवर संघटना ठाम; ५० हून अधिक प्रतिनिधींची उपस्थिती

**ओबीसी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष. बबलू कटरे यांनी संघटनेची भूमिका स्पष्ट करताना प्रशासनाला धारेवर धरले. ते म्हणाले, "फ ब्रुवारी महिन्यात होणाऱ्या अंतिम जनगणनेत ओबीसी जातनिहाय जनगणना समाविष्ट केली जाईल, असे आश्वासन शासनाकडून दिले जात आहे. मात्र, अशा पोकळ आश्वासनांवर आमचा अजिबात विश्वास नाही. जोपर्यंत शासन अधिकृत निर्णय घेऊन तो प्रत्यक्षात आणत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन आणि असहकार सुरूच राहील.**

**गोंदिया:–** स्वातंत्र्यापासून ओबीसी समाजावर सातत्याने अन्याय आणि फसवणूक होत आली आहे. त्यामुळे केवळ आश्वासनांवर आता आमचा विश्वास उरलेला नाही. शासनाने आगामी जनगणनेत "ओबीसी जातनिहाय जनगणना" करण्याचा स्पष्ट निर्णय आधी प्रत्यक्षात लागू करावा, त्यानंतरच ओबीसी सम ाज प्रशासनाला सहकार्य करेल, असा ठाम आणि आक्रमक पवित्रा ओबीसी संघर्ष कृती समितीने घेतला आहे.

**सीए राजेश चतुर यानीही भूमिका स्पष्ट करीत जनगणनेशिवाय आर्थिक तरतुद निश्चित होऊ शकत नसल्याचे पटवून देत ओबीसींची जनगणना सरकारने आधी करावी हीच भूमिका मांडली.**

ओबीसी जातनिहाय जनगणनेच्या संदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे जिल्हाधिकारी डॉ मंगेश गोंदावले यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला ओबीसी संघर्ष कृती समितीसह सकल ओबीसी समाज व विविध ओबीसी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी यांनी ओबीसी संघटनांना आगामी जनगणना प्रक्रियेवर बहिष्कार न टाकता, राष्ट्रीय हितासाठी शासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांचे हे आवाहन ओबीसी संघटनांनी फेटाळून लावले.

**तरच ओबीसी समाज सहकार्य करणार!**

बैठकीत ओबीसी प्रतिनिधींनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केली की, त्यांनी जिल्ह्यातील ओबीसी समाजाच्या तीव्र भावना आणि संघटनांची भूमिका तत्काळ शासनापर्यंत पोहोचवावी. तसेच, शासनाची या विषयावरील नेमकी भूमिका आणि दिलेली आश्वासने माध्यमातून जाहीरपणे जनतेसमोर मांडावीत, जेणेकरून पारदर्शकता राहील.

**प्रत्येक तालुक्यातून प्रतिनिधींची उपस्थिती**

या महत्त्वपूर्ण बैठकीला गोंदिया जिल्ह्यातील प्रत्येक तहसील (तालुक्यातून) ओबीसी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील सुमारे ५० हून अधिक प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वच प्रतिनिधींनी "जातनिहाय जनगणना नाही, तर सहकार्य नाही" या भूमिकेला एकमुखाने पाठिंबा दिला. ओबीसी संघटनांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे आगामी काळात जनगणनेच्या मुद्द्यावरून गोंदिया जिल्ह्यात प्रशासन आणि ओबीसी संघटना आमनेसामने येण्याची चिन्हे आहेत.

# ११९२ दुकानदारांना गाळेखाली करण्याची नोटीस; व्यापारी वर्गात खळबळ

## जुन्या व्यापाऱ्यांना करारासाठी प्राधान्य; १ महिन्याची मुदत

**या कारवाईमुळे प्रामाणिक व्यापाऱ्यांवर कोणताही अन्याय होणार नाही, अशी ग्वाही प्रशासनाने दिली आहे. जे जुने दुकानदार चालू बाजारभावानुसार नवीन कराराच्या अटी मान्य करतील, त्यांना दुकानांचे वाटप करताना पहिले प्राधान्य दिले जाईल. यासाठी व्यापाऱ्यांचा समावेश असलेली एक विशेष समिती देखील स्थापन केली जाणार आहे. जे व्यापारी नवीन नियमांना संमती देणार नाहीत, केवळ त्यांच्याच दुकानांचा जाहीर लिलाव केला जाईल. सध्या व्यापाऱ्यांना कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी १ महिन्याची मुदत देण्यात आली आहे.**




**गोंदिया :–** गोंदिया नगर परिषदेने शहरातील आपल्या मालकीच्या तब्बल १,१९२ दुकानांना गाळे खाली करण्याचे कडक नोटीस बजावले असून, यामुळे स्थानिक व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली आहे. नगर परिषदेच्या इतिहासामध्ये पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर ही धडक कारवाई हाती घेण्यात आली आहे. बाजार विभागातील अवघ्या ५ कम 'चाऱ्यांच्या खांद्यावर निवडणूक आणि जनगणनेच्या कामांसोबतच आता या नोटिसींचे युद्धपातळी- वर वाटप करण्याची जबाबदारी आल्याने कर्मचाऱ्यांची चांगलीच दमछाक होत आहे.

अनेक वर्षांपासून अनेक मूळ दुकानदारांनी नगर परिषदेच्या दप्तरी कोणतीही नोंद किंवा हस्तांतरण (ट्रान्सफर) न करता, आपापसात संगनमत करून दुकानांची बेकायदेशीर खरेदी-विक्री केली होती. लाखो रुपयांचे हे व्यवहार परस्पर पार पडल्याने पालिकेचा कोट्यवधींचा महसूल बुडत होता.

या नियमबाह्य व्यवहारांना चाप लावण्यासाठीच प्रशासनाने हा कठोर निर्णय घेतला आहे. शासकीय नियमांनुसार आणि महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६५ च्या तरतुदींनुसार, प्रत्येक ९ वर्षांनी गाळ्यांचा फेर-लिलाव करून नवीन करारनामा करणे बंधनकारक आहे. मात्र, गोंदिया नगर परिषदेत अनेक वर्षांपासून नवीन करार झाले नव्हते की लिलाव प्रक्रिया झाली नव्हती.

नगर परिषदेचे अध्यक्ष सचिन शेंडे यांनी स्पष्ट केले की, पालिकेची ढासळलेली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि तिजोरीत कोट्यवधी रुपयांचा महसूल जमा करण्यासाठीच हे पाऊल उचलण्यात आले आहे.

# आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी पोलीस आयुक्तांची घेतली भेट व मेट्रो सफारीचा लुटला आनंद



**गोंदिया :–** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय देवरी अंतर्गत येत असलेल्या शासकीय कन्या आश्रमशाळा बोरगाव/बाजार येथील उन्हाळी शिबिरातील विद्यार्थ्यांना सुप्त कला–गुणांना वाव देण्यासाठी दि.१८ मे २०२६ रोजी नागपूर येथे अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आश्रमशाळेतील २३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

सदर अभ्यास दौऱ्यामध्ये झिरो माईल्स ते खापरी दरम्यान मेट्रोने विद्यार्थ्यांनी प्रवास केला. मेट्रोने प्रथमतःच प्रवास करतांना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसांडून वाहत होता. या आनंदामध्ये काही विद्यार्थ्यांनी गोंडी नृत्यावर डान्स करुन आनंद साजरा केला तर काही विद्यार्थ्यांनी ड्रामाच्या माध्यमातून राणी दुर्गावती यांचे सादरीकरण केले. काही विद्यार्थ्यांनी धावत्या मेट्रोमध्ये क्रांतीसुर्य वीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे रांगोळीच्या स्वरु–पात चित्र साकारले. तसेच काही विद्यार्थ्यांनी मेट्रोमध्ये मातीच्या कलाकृती, गोंडी चित्रे, बांबूपासून साहित्य तयार केले व उपस्थित अधिकारी यांचेसमोर तयार केलेल्या साहित्याचे सादरीकरण केले.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने उपायुक्त विकास राचेलवार, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी नागपूर मयुरी शिंदे व प्रकल्प अधिकारी देवरी उमेश काशिद, सहाय्यक प्रकल्प अधिकारी डॉ.सायली चिखलीकर, तसेच अधिकारी, मुख्याध्यापक, अधिक्षक व कर्मचारी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना भेटून संवाद साधला.

यानंतर पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर येथे भेट देण्यात आली. या भेटीमध्ये पोलीस आयुक्त नागपूर डॉ.रविंद्रकुमार सिंघल यांचेकडून विविध शस्त्रांबाबत माहिती देण्यात आली. तसेच कायदा व सुव्यवस्था संदर्भात विद्यार्थ्यांसोबत सविस्तर चर्चा करुन पोलीस विभागातील विविध पदाच्या नोकरी संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देवून विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. तसेच आयपीएस (खझड) अधिकारी होण्याचे अनुषंगाने विद्यार्थ्यांना प्रेरित असे मार्गदर्शन केले.

यानंतर आश्रम शाळेतील २३० विद्यार्थ्यांना शहरी भागातील आधुनिक सोयी–सुविधांची प्रत्यक्ष ओळख व्हावी, या उद्देशाने ना–गपूर येथील मव्हीआर मॉलफ (तठ चरश्रश्र) येथे एका विशेष भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी मॉलमध्ये मांडण्यात आलेल्या विविध वस्तूंची प्रदर्शने पाहिली, तसेच मगेम टाईम झोनफ्मधील विविध खेळांचा आनंद घेतला. याप्रसंगी राज्यसभा खासदार मायाताई इवनाते आणि परिणय फ ुके यांच्या सुविद्य पत्नी डॉ.परिनिता फुके यांनी सदर ठिकाणी भेट देवून विद्यार्थ्यांसोबत गेम खेळणे, त्यांनी तयार केलेल्या विविध वस्तूंची पाहणी, विद्यार्थ्यांचे एकपात्री नाट्य प्रयोग, तसेच उन्हाळी शिबिरातील विविध उपक्रमांचा व कार्यप्रणालीचा आढावा घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः रेखाटलेली मगोंडी चित्रेफ आणि बांबूपासून तयार केलेल्या कलाकुसरीच्या वस्तू मान्यवरांसमोर सादर केल्या व त्यांना भेट वस्तू म्हणून दिल्या. तद्नंतर त्यांनी विद्यार्थ्यांसोबत आईसक्रिमचा आस्वाद घेत संवाद साधला.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे विशेष कौतुक केले. यानंतर विद्यार्थ्यांनी मान्यवरांसमवेत आईस्क्रीमचा आस्वाद घेत, या आनंददायी व माहितीपूर्ण भेटीची सांगता केली.

# स्वच्छतेत "तांडा' ग्राम पंचायतीला स्व. आबासाहेब खेडकर जिल्हास्तरीय विशेष पुरस्कार



**गोंदिया :–** ग्रामपंचायतीने स्वच्छतेच्या चळवळीत एक मानाचा तुरा खोवला असून, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान (सन २०२५–२६) अंतर्गत राबविण्यात आलेल्या ङ्गराष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेचाफ निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यामध्ये तांडा ग्रामपंचायतीने उत्कृष्ट शौचालय व्यवस्थापनाचा मानाचा "स्व. आबासाहेब खेडकर जिल्हास्तरीय विशेष पुरस्कार' पटकावला असून, याअंतर्गत गावाला ५० हजार रुपयांची सन्मान राशी प्राप्त झाली आहे.

शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत गावोगावी स्वच्छतेची चळवळ उभी राहावी यासाठी दरवर्षी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान राबविले जाते. यावर्षी २०२५–२६ च्या स्पर्धेत तांडा गावाने हिरिरीने सहभाग घेतला होता. गावात १०० टक्के हागणदारीमुक्ती टिकवून ठेवणे, शौचालयांचा नियमित वापर, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन यावर ग्रामपंचायतीने विशेष भर दिला होता.

या उत्कृष्ट "शौचालय व्यवस्थापन गुणवत्तेची' दखल घेत जिल्हास्तरीय समितीने तांडा गावाची या विशेष पुरस्कारासाठी निवड केली आहे. हे यश केवळ एका व्यक्तीचे नसून संपूर्ण गावाची एकजूट आणि लोकसहभागाचे फळ आहे. या अभियानात गावातील सर्व ग्रामस्थ, नागरिक, ग्रामपंचायतीचे विद्यमान पदाधिकारी, विविध समि त्यांचे सदस्य आणि ग्रामस्तरावरील सर्व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. यामध्ये गावातील महिलांची आणि महिला ग्रामसंघाचे बचत गट सदस्य व पदाधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली, ज्यांनी घरोघरी जाऊन स्वच्छतेबाबत जनजागृती केली

आणि शौचालय व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून दिले. जिल्हास्तरा–वरील या प्रतिष्ठेच्या पुरस्कारावर तांडा गावाने मोहोर उमटवल्यामुळे संपूर्ण तालुक्यात गावाचे नाव उंचावले असून, सध्या गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वाता–वरण पाहायला मिळत आहे. ग्राम पंचायत कार्यालयातर्फे या यशाचे श्रेय सर्व गावकऱ्यांना देण्यात आले असून, पदाधिकारी आणि प्रशास–नाने सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून अभिनंदन केले आहे.

# नवेगावबांधच्या नौकाविहाराने पर्यटनाला नवी भरारी



**नवेगावबांध :–** निसर्गरम्य नवेगावबांध तलावात सुरू झालेल्या नौकाविहार प्रकल्पाने अवघ्या काही आठवड्यांतच पर्यटन क्षेत्रात नवी ऊर्जा निर्माण केली आहे. परिसरातील आर्थिक घडामोडींनाही वेग दिला आहे. पर्यटनाला चालना देतानाच या प्रकल्पामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असून व्यावसायिकांम ध्येही समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेनंतर 'एस. के. इन्फ ा' कंपनीला पुढील पाच वर्षांसाठी प्रकल्पाचे कंत्राट देण्यात आले आहे. ८ एप्रिल २०२६ रोजी या प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली होती. त्यानंतर अवघ्या दीड महिन्यातच पर्यटकांची संख्या वाढल्याने बाजारपेठेत आर्थिक उलाढाल वाढली आहे

नवेगावबांधच्या पर्यटन क्षेत्रात मोठा बदल जाणवू लागला आहे. सुमारे तीन हजार एकर परिसरात विस्तारलेल्या नवेगावबांध तलाव–ातील पाच एकर क्षेत्रात हा सुरक्षित आणि आधुनिक नौकाविहार प्रकल्प उभारण्यात आला आहे. विस्तीर्ण जलाशय, हिरवागार परिसर आणि शांत वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी विदर्भासह महाराष्ट्रातील विविध भागांतून पर्यटक मोठ्या प्रमाणात येथे दाखल होत आहेत.

गोंदिया, भंडारा, नागपूरसह छत्तीसगड, मध्य प्रदेश आणि तेलंगणा राज्यातील पर्यटकांची पावले आता नवेगावबांधकडे वळत असल्याचे चित्र आहे. स्थानिक व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार पर्यटनामध्ये सुमारे २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. नौकाविहारामुळे फक्त बोटिंग व्यवसायालाच नव्हे तर हॉटेल्स, लॉजिंग व्यवस्था, खाद्यपदार्थ विक्रेते, छोटे दुकानदार आणि इतर सेवा क्षेत्रांनाही मोठा फायदा होत आहे. वाढत्या पर्यटक संख्येमुळे स्थानिक बाजारपेठेत आर्थिक उलाढाल वाढली असून परिसरात चैतन्य निर्माण झाले आहे.

**पर्यटकांना दुहेरी आनंद**

नवेगावबांध आणि नागझिरा परिसरातील पर्यटनाला या प्रकल्पामुळे नवे स्वरूप मिळाले आहे. जलपर्यटन आणि जंगल सफारी यांचा एकत्रित अनुभव घेण्यासाठी पर्यटकांकडून मोठी पसंती मिळत आहे. त्यामुळे बोट चालक, पर्यटन मार्गदर्शक, वाह–तूक सेवा, हॉटेल कर्मचारी आणि इतर संबंधित क्षेत्रांमध्ये स्थानिक युवकांसाठी रोजगाराचे नवीन मार्ग खुले होत आहेत. उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर केल्यास स्थानिक पातळीवर विकासाची नवी दिशा कशी निर्माण होऊ शकते, याचे उदाहरण म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जात आहे.

### शासकीय व खाजगी आस्थाप-नातील अंतर्गत तक्रार निवारण समिती तपासणी मोहीम

**गोंदिया :–** राज्यातील सरकारी, निमसरकारी तसेच खासगी आस्थाप–नांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी मकामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निव–ारण) अधिनियम २०१३ (झजडक अलीं २०१३) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश महिला व बाल विकास विभागाने दिले असून यासंदर्भात राज्याच्या महिला व बाल विकास विभागाने दि.१४ मे २०२६ रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे.

त्यानुसार गोंदिया जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या अंतर्गत तक्रार समित्यांची तपासणी करण्यासाठी परिपत्रकानुसार जिल्हा अधिकारी, महिला व बाल विकास आयुक्तालय स्तरावरील संबंधित अधिकारी, कर्मचारी, विभागीय उप आयुक्त महिला व बाल विकास, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी जिल्हा परिषद, बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी, ग्रामीण व आदिवासी प्रकल्प), जिल्हा परिविक्षा अधिकारी, परिविक्षा अधिकारी, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी, जिल्हास्तर व तालुकास्तरावरील संरक्षण अधिकारी, अंगणवाडी मुख्य सेविका व पर्यवेक्षिका तसेच शासकीय व स्वयंसेवी संस्थांचे शासनाने नियुक्त केलेले अधीक्षक/अधीक्षिका यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

# चिचगड वनपरिक्षेत्रातील गॅबियन बंधाऱ्यांमध्ये कोट्यवधींचा गैरव्यवहार



**नवेगावबांध:–** चिचगड वनपरिक्षेत्रात कोट्यवधी रुपयांच्या निधीतून करण्यात आलेल्या गॅबियन बंधाऱ्यांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी काही कंत्राटदारांशी संगनमत करून नियमबाह्य पद्धतीने निकृष्ट दर्जाची कामे करून शासनाच्या निधीवर मोठा डल्ला मारल्याचा आरोप माहिती अधिकार कार्यकर्ते विजय डोये यांनी केला आहे.

या बांधकामांचे अधिकृत करारनामे होण्यापूर्वीच प्रत्यक्ष बांधकामे करण्यात आल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. याबाबत संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनीच अनौपचारिक चर्चेत ही बाब मान्य केल्याचे सांगितले. त्यामुळे संपूर्ण प्रक्रिया पूर्वनियोजित पद्धतीने राबवून नियमांना हरताळ फासण्यात आल्याचा आरोप आहे. माहिती अधिकारअंतर्गत मागवण्यात आलेल्या माहितीतून हा प्रकार उघड होण्याची शक्यता असल्यानेच संबंधित अधिकारी माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचा आर–ोप करण्यात आला आहे. विजय डोये यांनी विविध योजनांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामांची माहिती, अंदाजपत्रके, निविदा प्रक्रिया, खर्चाचा तपशील, लाभार्थी व कामांची प्रशासकीय मान्यता यासंबंधी माहिती मागवली होती. मात्र, नियमानुसार माहिती न देता वेळकाढूपणा करण्यात आल्याने त्यांनी प्रथम अपील दाखल केले. एका गॅबियन बंधाऱ्यासाठी सुमारे २ लाख रुपयांचा खर्च दाखवण्यात आला असताना प्रत्यक्षात केवळ १५ ते २० हजार रुपयांत काम उरकून उर्वरित निधीची अफरातफ र केल्याचा आरोप आहे. अनेक कामांमधून कोट्यवधी रुपयांचा निधी लाटण्यात आल्याची चर्चा आहे.या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून संबंधित अधिकारी, कंत्राटदार आणि जबाबदार वरिष्ठांवर फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# लॉयड्स व्हिलेज प्रीमियर लीग क्रिकेट सामन्यांची भव्य सांगता




**गडचिरोली :–** लॉयड्स व्हि–लेज प्रीमियर लीग २०२६ ची सांगता लॉयड्स स्पोर्ट्स ग्राउंड, हेडरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाली. ग्रामीण खेळाडूंचा सहभाग, थरारक क्रिकेट सामने आणि स्थानिक नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने वातावरण भारावून गेले होते. या क्रिकेट सामन्यांमुळे एटापल्ली परिसरातील ग्रामीण क्रीडा प्रतिभेला संधी मिळाली. तसेच क्रीडाभावना आणि एकात्मता वृद्धिंगत करणारा हा स्पर्धा सोहळा ठरला. अत्यंत रोमांचक अशा अंतिम सामन्यात बीसीसीसी आलदंडी संघाने टोडसा ट्रॉफी फायटर्स संघाचा ३ धावांनी रोमांचक पराभव करून ङतझङ २०२६ ची ट्रॉफी पटकावली.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा देताना लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक बी.प्रभाकरन म्हणाले, ङ्गया स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल मी लॉयड्स स्पोर्ट्स अकादमी आणि संपूर्ण आयोजन समितीचे अभिनंदन करतो. स्थानिक भागातील युवकांना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देणे, जेणेकरून ते गडचिरोलीतून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा सादर करू शकतील, हा आमचा प्रयत्न राहिला आहे. अशा स्पर्धांमुळे ग्राम ीण स्तरावरील क्रीडा प्रतिभेला प्रोत्साहन मिळेल आणि स्थानिक प्रतिभावंत खेळाडूंची ओळख होण्यास मदत होईल.

विजेता संघ बीसीसीसी आलदंडी यांना ट्रॉफीसह ७५,००० चे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले, तर उपविजेता टोडसा ट्रॉफी फायटर्स यांना ५०,०००, तर हेडरी हरिकेन्स संघाने तिसरे स्थान मिळवत ३०,००० जिंकले, याशिवाय नेंदर इलेव्हन हिरोज संघाला चौथ्या स्थानासाठी २०,००० प्रदान करण्यात आले. उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचलेल्या संघांनाही त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रत्येकी १०,००० चे पारितोषिक देण्यात आले.

हेडरी हरिकेन्सचे प्रसन्नजीत सरकार यांना उत्कृष्ट अष्टपैलू कामगिरीसाठी "मॅन ऑफ द सिरीज" घोषित करण्यात आले आणि १०,००० चे पारितोषिक देण्यात आले. तसेच उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक, उत्कृष्ट यष्टीरक्षक, उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू, उत्कृष्ट युवा खेळाडू आणि सामनावीर असे वैयक्तिक पुरस्कारही प्रत्येकी ३,००० रोख पारितोषिकासह प्रदान करण्यात आले.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या गावातील मान्यवर, पोलीस अधिकारी, स्वयंसेवक, सीएसआर टीम सदस्य, लॉयड्सच्या विविध विभागांचे कर्मचारी आणि ग्रामस्थ यांचे आयोजकांनी आभार मानले.

# पर्यटनाला वाव मिळेल असे वृक्षारोपण करावे-जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले



## यावर्षी जिल्ह्याला १७ लाख वृक्षारोपणाचे उद्दिष्ट

**गोंदिया :–** गोंदिया जिल्हा वनसंपदेने संपन्न असून गोंदिया जिल्ह्यात पर्यटनाला पूरक असे वृक्षारोपण केल्यास अधिक पर्यटक वळवता येऊ शकतात असे नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांनी वृक्षारोपण संदर्भात आयोजित आढावा बैठकीत दिले.

वर्ष २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचे उद्देश असून याच पावलावर महाराष्ट्रालाही विकसित घडविणे आहे. राज्याचा सर्वसमावेशक विकास व्हावा यासाठी हरित महाराष्ट्र आयोगाच्या अंतर्गत राज्यामध्ये ३०० कोटी वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण झाल्यास राज्यात ३३% पर्यंत वनाच्छादन व वृक्षाच्छादन वाढ होईल. यासाठी जिल्ह्याला यावर्षी १७ लाख वृक्षारोपणाचे उद्दिष्ट मिळालेले आहे.

यानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित बैठकीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम. मुरुगानंथम, उपवनसंरक्षक पवन कुमार जोंग, निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, सर्वच विभाग प्रमुख, तसेच अदानी फाउंडेशन, नेचर केअर फाउंडेशन, वृक्षधारा फाउंडेशन, लायन्स क्लब, सांस्कृतिक महिला मंडळ, सावन बहेकार सेवा सारस मित्र या गैरशासकीय संस्थेचे पदाधिकारी बैठकीस उपस्थित होते.

जिल्ह्यामध्ये ५१ टक्के वनसंपदा लाभलेली असून या वनसंपदेत भर टाकून जिल्ह्याला अधिक सुंदर करण्यासाठी वृक्षारोपण योग्य आणि नियोजित पद्धतीने करण्याची गरज असल्याचे जिल्हाधिकारी म्हणाले. या वृक्षारोपणामुळे भविष्यात कार्बन क्रेडिट आणि ग्रीन क्रेडिट वाढणार आहे, त्याचा परिणाम भविष्यातील पिढीला होईल. निसर्गाचे चक्र सुव्यवस्थित सुरू ठेवण्यासाठी वृक्षारोपणाची आवश्यकता असून या अंतर्गत बियाणे, नर्सरी तयार होऊन आर्थिक लाभ मिळवता येऊ शकते असेही जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले. वृक्षारोपण करताना जिल्ह्यातील वातावरणाला अनुकूल आणि उदरनिर्वाहासाठी पुरक असेच वृक्षारोपण करावेत. तसेच वड व पिंपळ यास–ारखे वातावरणीय परिसंस्थेला उपयोगी असणाऱ्या अशाच वृक्षांची वृक्षारोपण करण्याचे नियोजन असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. पुढील वीस वर्षात नियोजित पद्धतीने वृक्षारोपण करायचे असून कुठे कसे वृक्षारोपण करण्यात येईल याची संभाव्य एकूण माहिती दिली जाईल, त्यामुळे नियोजित पद्धतीने वृक्षारोपण झाल्यास रोपांचे संगोपन आणि संवर्धन होऊ शकणार. हरित महाराष्ट्र आयोगाच्या माध्यमातून जीआय टॅगिंग केले जाईल, त्यामुळे नवीन लावलेल्या रोपांचे पुढील पाच वर्षात योग्य रखरखाव होईल.

**कृष्णा सहयोगी तंत्र शिक्षण संस्था, देवरी द्वारा संचालित**

**छत्रपती शिवाजी ज्यु.कॉलेज ऑफ एज्युकेशन, देवरी ता.देवरी, जि.गोंदिया**

**एन.सी.टी.ई.भोपाल व महाराष्ट्र शासनद्वारा मान्यता प्राप्त**

**व्यवस्थापन कोटा**

**डी.एल.एड.प्रवेश सुचना** 2026-27

कायम विना अनुदानित मराठी माध्यम डी.एल.एड.प्रथम वर्ष २०२६–२७ व्यवस्थापनकोट्यातील १० जागा करिता प्रवेश शुरु आहे.

| SC | ST | NJNT | OBC/SBC | OPEN | TOTAL |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 01 | 01 | 02 | 05 | 10 |

अर्ज विक्री व भरणे :दि.११/५/२०२६ पासून (सुट्टीचे दिवस सोडून)

आवेदन अर्जाची किंमत खुला प्रवर्ग :२००/– रुपये, मागासवर्गीय–१००/– रुपये इयत्ता १२ वी मध्ये खुल्या प्रवर्गासाठी ४९.५० टक्के गुण व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४४.५० टक्के गुण आवश्यक.

**संपर्क:** 7447885145,9545443325

**सचिव**
**कृ.सह.तंत्र शिक्षण संस्था देवरी, जि.गोंदिया**

**प्राचार्य**
**छत्रपती शिवाजी ज्यु.कॉ.ऑ.एज्युकेशन देवरी, जि.गोंदिया**